


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ६९ * नांदेड * शनिवार, दि. १४ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# सिलेंडर नेणाऱ्या वाहनांना पोलिसांनी सुरक्षा द्या, सरकारच्या सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

## पुरवठ्यामध्ये समन्वय साधण्यासाठी कंट्रोल रूम बनविण्याचे निर्देश

**मुंबई (प्रतिनिधी)–** इराण-इस्राईल युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडर सुरळीत पुरवठयाबाबत राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत. घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याची नागरिकांनी निश्चिंतता बाळगावी, अशी ग्वाही अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे. मार्च महिन्यामध्ये गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध असून युध्दाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि सर्व सरकारी गॅस कंपन्यांचे अधिकारी यांचा या समित्यांमध्ये समावेश असेल. गॅस पुरवठा साखळीवर देखरेख ठेवणे, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच दररोज परिस्थितीचा आढावा घेऊन अहवाल सादर करणे ही समित्यांची प्रमुख जबाबदारी असेल. मुंबई-ठाणे रेशनिंग क्षेत्रात नियंत्रक, रेशनिंग यांच्या नियंत्रणाखाली स्थापन केलेल्या समितीत पोलीस उप आयुक्त आणि उपनियंत्रक (रेशनिंग) समितीत समावेश करण्यात येणार असून मुंबई आणि ठाणे शहरातील सर्व उपायुक्तांशी सह पोलीस आयुक्त (प्रशासन) समन्वय साधणार आहेत. पर्यायी इंधनाच्या वापराची शक्यता तपासण्याचे निर्देशही यंत्रणांना देण्यात आले आहेत. यामध्ये कोळसा, रॉकेल आदी पर्यायांचा विचार केला जाणार असला तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच जिल्हास्तरीय समित्यांनी हॉटेल व रेस्टॉरंट संघटनांसोबत बैठक घेऊन पर्यायी इंधनाच्या वापरासाठी प्रोत्साहन देण्याचे निर्देश दिले आहेत.

## अमेरिकेकडून भारतासह सर्व देशांना रशियन तेल खरेदी करण्याची तात्पुरती परवानगी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** इराणसोबत सुरू असलेल्या अमेरिका-इस्रायल युद्धामुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमती १०० डॉलर्सच्या वर गेल्या आहेत. यावर उपाय म्हणून आता ट्रम्प प्रशासनाने इतर देशांना रशियाकडून तेल खरेदी करण्याची तात्पुरती परवानगी दिली आहे, कारण अनेक रशियन तेल टँकर समुद्रात अडकले आहेत. यापूर्वी, अमेरिकेने भारताला रशियाकडून कच्चे तेल खरेदी करण्यासाठी निर्बंध शिथिल करण्याचा प्रस्ताव मांडला होता. तथापि, भारतीय अधिकाऱ्यांनी सांगितले आहे की भारत तेल खरेदी करण्यासाठी कोणत्याही देशाच्या परवानगीवर अवलंबून नाही.

अमेरिकेच्या ट्रेझरी विभागाने (वित्त मंत्रालयाने) गुरुवारी परवाना जारी केला. या परवान्याअंतर्गत, १२ मार्च रोजी रात्री १२:०१ वाजेपूर्वी जहाजांवर लोड केलेल्या रशियन कच्चे तेल आणि पेट्रोलियम उत्पादनांची डिलिव्हरी आणि विक्री करता येते. ही सूट फक्त ११ एप्रिलपर्यंत वैध आहे. वाढत्या किमती रोखण्यासाठी जागतिक तेल पुरवठा वाढवणे हा यामागील उद्देश असल्याचे अमेरिकेचे ट्रेझरी सचिव स्कॉट बेसंट यांनी सांगितले.

अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसंट यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर लिहिले की राष्ट्राध्यक्ष ट्रम्प जागतिक ऊर्जा बाजारपेठ स्थिर करू इच्छितात. त्यांनी म्हटले आहे की हा एक अल्पकालीन निर्णय आहे आणि त्यामुळे रशियाला कोणताही महत्त्वपूर्ण आर्थिक फायदा होणार नाही. बेसंट यांच्या मते, रशियाच्या महसुलाचा मोठा भाग तेल उत्खनन दरम्यान आकारल्या जाणाऱ्या करांमधून येतो, तर ही सूट फक्त आधीच वाहतुकीत असलेल्या तेलावर लागू होते.

## देशातील गॅस संकटावरून लोकसभेत विरोधकांचा हल्लाबोल

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास सुरू होताच विरोधकांनी गोंधळ घातला. राहुल गांधींसह विरोधी पक्षाच्या खासदारांनी देशातील गॅस संकटावरून लोकसभेत हल्लाबोल केला.त्यानंतर लोकसभा प्रथम दुपारी १२ वाजेपर्यंत आणि नंतर पुन्हा २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आली. दुपारी २ वाजता सुरू झालेले कामकाज केवळ एक तास चालले. त्यानंतर लोकसभा १६ मार्चपर्यंत तहकूब करण्यात आली. या काळात विरोधकांनी गोंधळ घालत पंतप्रधान मोदींविरुद्ध घोषणाबाजी सुरूच ठेवली.

यापूर्वी, विरोधी पक्षांनी संसदेच्या परिसरात पोस्टर दाखवत एलपीजी संकटाचा निषेध केला. राज्य विधानसभाही दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आली. सूत्रांच्या हवाल्याने पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार तृणमूल काँग्रेसने (टीएमसी) मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना त्यांच्या पदावरून हटवण्यासाठी दोन्ही सभागृहात प्रस्ताव आणला आहे.

अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या की, परदेशातील घडामोडींमुळे देशात काही अडचणी येत आहेत. सरकार आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि पूर्णपणे तयार राहण्यासाठी पावले उचलत आहे. अशा वेळी, विरोधकांनी सरकारच्या खांद्याला खांदा लावून उभे राहिले पाहिजे, परंतु ते बेजबाबदारपणे वागत आहे. आपल्या भाषणादरम्यान, सीतारमण यांनी बिजनौरच्या नगीना येथील खासदार चंद्रशेखर रावण यांना त्यांच्या नावातून रावण हा शब्द काढून टाकण्यास आणि त्याऐवजी विदुर असे शब्द वापरण्यास सांगितले, कारण महाभारत संपल्यानंतर विदुर बिजनौरमध्ये आला होता.

सीतारमण म्हणाल्या की, परदेशातील घडामोडी आपल्या देशासमोर आव्हाने निर्माण करत आहेत. तथापि, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली या आव्हानांना तोंड देण्यासाठी, आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि पूर्ण तयारी सुनिश्चित करण्यासाठी पावले उचलली जात आहेत. यावेळी, विरोधी पक्षांनी सरकारसोबत खांद्याला खांदा लावून उभे राहून जनतेला आश्वस्त केले पाहिजे. उलट, ते बेजबाबदार पावले उचलून जनतेची दिशाभूल करत आहेत, ज्याचा तीव्र निषेध केला पाहिजे.

# जिल्ह्यात १६ व १७ मार्च रोजी येलो अलर्ट जारी

## जिल्ह्यात वादळी वारे, विजेच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पावसाची शक्यता

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी १३ मार्च २०२६ रोजी सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी १६ व १७ मार्च २०२६ या दोन दिवसांसाठी येलो अलर्ट जारी केलेला आहे. १६ व १७ मार्च २०२६ हे दोन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

**या गोष्टी करा :** विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

**या गोष्टी करु नका:** आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे.

# नांदेड पोलीस आयुक्तालयासाठी खा. अशोकराव चव्हाणांनी घेतली पोलीस महासंचालकांची भेट



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी शुक्रवारी मुंबई येथे राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांची भेट घेतली. या भेटीत नांदेड शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत तसेच सेफ सिटी प्रकल्पाच्या अंमलबजावणीसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

नांदेड शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे राखण्यासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची लवकरात लवकर निर्मिती करण्याची गरज खा. अशोकराव चव्हाण यांनी सदर भेटीत अधोरेखित केली. याबाबतच्या पुढील कार्यवाहीवर देखील विचारविनिमय झाला. सेफ सिटी प्रकल्पांतर्गत नांदेड शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांवर अत्याधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याच्या प्रस्तावावरही याप्रसंगी चर्चा झाली. नांदेड- वाघाळा शहर महानगरपालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीने प्रसिद्ध केलेले घोषणापत्र 'विकसित नांदेडचा संकल्पनामा'मध्ये नांदेडला या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन देण्यात आले होते.

बैठकीला उपस्थित भोकर विधानसभा मतदारसंघाच्या भाजपा आमदार श्रीजया चव्हाण यांनी तालुका मुख्यालयांच्या शहरांचा सेफ सिटी प्रकल्पात समावेश करण्याची सूचना मांडून भोकर, मुदखेड व अर्धापूर येथे या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याची मागणी केली. या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली असून, नांदेड शहर पोलीस आयुक्तालय व 'सेफ सिटी प्रोजेक्ट'साठी शासन स्तरावर पुढील पाठपुरावा करण्यात येईल, असे खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे. या बैठकीला पोलीस महानिरीक्षक (नियोजन व समन्वय) सुवेझ हक देखील उपस्थित होते.

## गॅस सिलिंडरच्या मागणीत २० ते २२ लाखांनी वाढ

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** गॅस तुटवड्यामुळे केवळ व्यावसायिकच नव्हे, तर त्यावर अवलंबून असणारे शेकडो कामगार आणि स्थानिक बाजारपेठ धोक्यात आल्याचे दिसू लागले आहे. राज्यात मुंबई, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजी नगर, पुणे यासारख्या महत्त्वाच्या शहरांमध्ये ऊर्जा टंचाईचे धक्के बसू लागल्याचे गुरुवारी चित्र दिसत होते. ही भीती ग्रामीण भागातही पसरू लागल्याने अनेक छोटी उपाहारगृहे, हॉटेल, धाबे यांच्यामध्ये चिंतेचे वातावरण दिसू लागले आहे. गॅस सिलिंडरबाबत दररोज नवनवीन अफवा पसरत असल्याने देशामध्ये गॅस सिलिंडरच्या दररोजच्या मागणीत २० ते २२ लाखांनी वाढ झाली आहे.

मध्य पूर्वेतील युद्धामुळे भारतासह जगभरात ऊर्जा संकटाचा धोका निर्माण झाला आहे. भारतातही विविध राज्यांत गॅस सिलेंडर टंचाईच्या झळा बसण्यात सुरुवात झाली आहे. पेट्रोलियम मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी पत्रकार परिषद घेऊन परिस्थितीची माहिती दिली.

## चढ्या दराने खताची विक्री केल्याने देगलूर तालुक्यातील पाच कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित

**नांदेड (प्रतिनिधी)–** देगलूर तालुक्यातील शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींची गंभीर दखल घेत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाने तालुक्यातील काही कृषी सेवा केंद्रांवर कारवाई केली आहे. रासायनिक खतांची कमाल विक्री किंमतीपेक्षा अधिक दराने विक्री केल्याप्रकरणी पाच कृषी निविष्ठा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

शेतकऱ्यांकडून मिळालेल्या तक्रारीनंतर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) तसेच तालुका कृषी अधिकारी कार्यालय, देगलूर यांना तपासणीचे आदेश दिले होते. या तपासणी अहवालानुसार पांडुरंग कृषी सेवा केंद्र, गणेश कृषी सेवा केंद्र, जिजाई कृषी सेवा केंद्र, सोनी कृषी सेवा केंद्र आणि आनंद फर्टिलायझर्स, देगलूर या पाच कृषी निविष्ठा केंद्रांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्या. तपासणीदरम्यान रासायनिक खतांची कमाल किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री करणे, तसेच युरिया खत उपलब्ध असूनही शेतकऱ्यांना विक्री न करणे अशा प्रकारच्या तक्रारींची पुष्टी झाल्याने सुनावणीनंतर संबंधित केंद्रांचे परवाने निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.


दरम्यान, जिल्ह्यात कुठेही रासायनिक खतांची जादा दराने विक्री होत असल्यास, विनापरवाना विक्री होत असल्यास किंवा खते उपलब्ध असूनही विक्री केली जात नसल्यास नागरिकांनी तात्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

## महापालिकेच्या आठ स्वीकृत सदस्यांचे नशिब बंद लिफाफ्यात; १६ तारखेला होणार अधिकृत घोषणा

**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेची सत्ता ही भाजपच्या हाती आल्याने अनेक इच्छुकांनी नामनिर्देशित सदस्य (स्वीकृत) पदासाठी आपापल्या स्तरावरून महापालिकेत मागणी केली आहे. १०० हून अधिक जणांनी वेगवेगळ्या पक्षांकडून अर्ज दाखल करण्यात आले आहेत. सर्व पक्षाकडून आठ सदस्य नियुक्त करण्यात येणार आहेत. यात भाजप-शिवसेना पाच, एमआयएम एक आणि काँग्रेस-वंचित कडून दोन सदस्यांचा समावेश असणार आहे.

महापालिकेत स्वीकृत सदस्यांसाठी भाजपकडून ॲड. दिलीप ठाकूर, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुख, शुभांगी देवसरकर, आशुतोष जोशी, कुणाल कंदकुर्ते तसेच काँग्रेसकडून आनंद चव्हाण, बालाजी चव्हाण, महेंद्र घोडजकर, मुन्ना अब्बास तर वंचितकडून शेख बिलाल, श्याम कांबळे, विठ्ठल गायकवाड यासोबतच एमआयएमकडून शमीम अब्दुल्ला, अकबरखान पठाण, नासेर अहेमद यांची नावं संभाव्य यादीत असल्याचे चर्चिले जात आहेत.

महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा ही १६ मार्च रोजी होणार आहे. या सर्वसाधारण सभेमध्ये स्वीकृत सदस्यांसह महिला बालकल्याण आणि स्थायी समिती सदस्यांचीही वर्णी लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. भाजप- शिवसेना, वंचित बहुजन आघाडी- काँग्रेस आणि एमआयएम या पक्षांनी स्वीकृत सदस्यांसाठी आपल्या उमेदवारांचे नाव जवळपास फिक्स केले असले तरी त्याचा उलगडा अद्याप करण्यात आला नाही. सर्व पक्षांकडून स्वीकृत सदस्यांचे बंद लिफाफे महापालिका आयुक्त यांच्याकडे सादर करण्यात आल्याचे सांगण्यात आले. भारतीय जनता पक्षाकडून व अन्य पक्षाकडून कोणाची वर्णी लागते याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.




# शेतकऱ्यांच्या केळीच्या बागा माथेफिरूंनी कोयत्याने कापल्या; गुन्हा दाखल

## १० लाखांच्या मालमत्तेचे नुकसान : ३२०० केळीचे झाडांची कत्तल



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील पार्डी (म) येथील पाच शेतकऱ्यांच्या शेतातील केळी बागांचे कोयत्याने नुकसान केल्याची घटना दि. १२ मार्च रोजीच्या रात्री घडली आहे. या घटनेत जवळपास ३२०० झाडांची कत्तल यासह सबलाईनच्या पाईपांची तोडफोड करण्यात आली आहे. या अज्ञात माथेफिरूंविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अर्धापूर तालुक्यातील पार्डी (म) येथील शेतकरी साईनाथ हापगुंडे गट क्र.१७९, प्रसाद हापगुंडे गट क्र. १७९, नवनाथ हापगुंडे गट क्र १२, प्रफुल्ल देशमुख, रवी कुमार पत्रे या शेतकऱ्यांच्या शेतात दि. १२ मार्च रोजी अज्ञात माथेफिरूंच्या गँगने केळीच्या ३२०० केळीच्या झाडांची कोयत्याने कत्तल केली. यामध्ये तब्बल १० लाख रूपयांच्या केळीचे नुकसान होणार आहे. तसेच शेतातील सबलाईन पाईप, तुषार पाईप, ठिंबक सिंचन पाईप ही जागोजागी कापले आहेत. या घटनेत शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. यापुर्वी पार्डीत सोयाबीनचे ढिग फुकून देणे, कारच्या काचा फोडणे, आखाड्यावरील पत्रे चोरून, हळदीचे बेणे चोरून दुसऱ्या जिल्ह्यात विकल्याच्या घटना परिसरात घडल्या आहेत.

या घटनेने शेतकऱ्यांत संतापाची लाट पसरली असून अज्ञात माथेफिरूंविरूद्ध अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात असून आरोपींवर कडक कारवाई करावी अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

याप्रकरणी कृऊबाचे संचालक व उपसरपंच निळकंठराव मदने यांनी पोलिसांनी या फिथेफिरूंचा शोध लावून कडक कारवाई करावी व वारंवार घडणाऱ्या या घटनांची पुनरावर्थी टाळावी अन्यथा उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

## बिलोली शहरात १५ तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** बिलोली शहरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची मोठ्या प्रमाणात विक्री तसेच कोटपा २००३ कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबत मिळालेल्या माहितीनुसार जिल्हास्तरीय तंबाखू नियंत्रण पथकाने १२ मार्च २०२६ रोजी बिलोली शहरात विविध ठिकाणी अचानक धाडी टाकून एकूण १५ तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई करून ६ हजार ४०० रुपये दंड वसूल केला.

ही कारवाई जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निर्देशाने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पांडुरंग पावडे व नोडल अधिकारी डॉ. हनमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात जिल्हा सल्लागार डॉ. शितल चातुरे, डॉ.संजीवनी जाधव, डेंटल सर्जन डॉ. पूजा काळे, मानसशास्त्रज्ञ प्रकाश आहेर, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते बालाजी गायकवाड, समुपदेशक सुंदर चव्हाण तसेच बिलोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्सटेबल एम.एस.मुद्देमवार पोलीस कॉन्सटेबल एन.एम.अंबुरे उपस्थित होते.

सार्वजनिक ठिकाणी तसेच शैक्षणिक अथवा शासकीय, निमशासकीय कार्यालयाच्या परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची विक्री अथवा सेवन किंवा साठवण होत असल्यास जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय नांदेड येथे तक्रार नोंदवून नांदेड जिल्हा तंबाखू मुक्त करण्याच्या या अभियानास सहकार्य करावे असे, आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी केले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# समान नागरी कायदाच खरा उपाय, पण कधी?

भारतीय लोकशाहीची पायाभूत रचना ही संविधानाने दिलेल्या समानतेच्या तत्त्वावर उभी आहे. धर्म, जात, लिंग किंवा पंथ कोणताही असो, प्रत्येक नागरिकाला समान हक्क मिळणे हीच भारतीय राज्यघटनेची मूलभूत भावना आहे. परंतु वास्तवात पाहिले असता काही वैयक्तिक कायद्यांमुळे अजूनही स्त्री-पुरुषांमध्ये भेदभाव दिसून येतो. मुस्लीम वारसा कायद्यातील काही तरतुदींविरोधात दाखल झालेल्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेले मत या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे आहे. वैयक्तिक कायद्यांमधील भेदभाव दूर करण्यासाठी समान नागरी कायदा हा खरा उपाय ठरू शकतो, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. सध्या मुस्लीम समुदायामध्ये विवाह, घटस्फोट, वारसा आणि कुटुंबीय संबंधांसाठी शरियत कायदा लागू आहे. या कायद्यानुसार वारसा वाटप करताना मुलाला मुलीपेक्षा दुप्पट हिस्सा मिळतो. पतीच्या मृत्यूनंतर पत्नीला केवळ १२.५ टक्के हिस्सा मिळतो, तर पत्नीच्या मृत्यूनंतर पतीला २५ टक्के हिस्सा मिळतो. या तरतुदींमुळे स्त्रियांवर अन्याय होतो, असा युक्तिवाद करत या कायद्याला आव्हान देण्यात आले आहे. समानता, सन्मान आणि न्याय या संविधानिक मूल्यांच्या कसोटीवर या तरतुदी टिकू शकत नाहीत, असेही याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने काही महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली. वैयक्तिक कायद्यांमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार मुख्यतः संसदेकडे आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने हेही सांगितले की, शरियत वारसा व्यवस्थेला अचानक रद्द केल्यास कायदेशीर पोकळी निर्माण होऊ शकते. त्यामुळे व्यापक सुधारणा करणे ही संसदेची जबाबदारी आहे. याच संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा समान नागरी कायद्याची गरज अधोरेखित केली. या कायद्याची नुसतीच कोरडी चर्चा मागच्या ५० वर्षांपासून होते आहे, परंतु प्रत्यक्षात मात्र त्या दृष्टीने कोणती हालचाल संसदेकडून होत असल्याचे दिसत नाही. भारतीय संविधानाच्या श्रेष्ठतेबाबत शंका नाही. पण या श्रेष्ठतेचा गोडवा गाणारे लोक देखील समान नागरी कायद्याबद्दल मूग गिळून आहेत. वास्तविक पाहता भारतीय राज्यघटनेच्या दिग्दर्शक तत्त्वांमध्ये कलम ४४ अंतर्गत समान नागरी कायद्याचा उल्लेख आहे. या तरतुदी-नुसार देशातील सर्व नागरिकांसाठी समान नागरी कायदा लागू करण्याचा प्रयत्न राज्याने करावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. म्हणजेच संविधान निर्मात्यांनी सुरुवातीपासूनच सर्व नागरिकांसाठी समान कायदा असावा, अशी दूरदृष्टी ठेवली होती. परंतु विविध सामाजिक-राजकीय, कट्टर धार्मिकता आणि इतर अशा कारणांमुळे हा मुद्दा दीर्घकाळ प्रलंबित राहिला. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात धार्मिक स्वातंत्र्याला मोठे महत्त्व आहे. संविधानाच्या कलम २५ नुसार प्रत्येक नागरिकाला आपला धर्म पाळण्याचा आणि प्रचार करण्याचा अधिकार आहे. याचाच गैरफायदा घेतल्या जात आहे. परंतु हा अधिकार पूर्णपणे निरंकुश नाही. जेव्हा धार्मिक प्रथा मानवी हक्कांवर, विशेषतः स्त्री-पुरुष समानतेवर आघात करतात, तेव्हा त्या प्रथांचा पुनर्विचार करणे आवश्यक ठरते. कारण संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार हे कोणत्याही धार्मिक प्रथेपेक्षा श्रेष्ठ मानले जातात. २०१७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने 'शायरा बानो' प्रकरणात तिहेरी तलाकची प्रथा रद्द केली होती. त्या निर्णयाने मुस्लीम महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्याचा मार्ग मोकळा झाला. त्याच धर्तीवर वारसा कायद्यांतील भेदभावावरही विचार होणे गरजेचे आहे. महिलांना समान हक्क देणे हे केवळ सामाजिक न्यायाचेच नव्हे तर संविधानिक कर्तव्याचेही प्रतीक आहे. समान नागरी कायद्याचा अर्थ कोणत्याही धर्मावर आघात करणे असा नाही. उलट, सर्व नागरिकांसाठी समान आणि न्याय्य कायदे असावेत, ही त्यामागील मूलभूत संकल्पना आहे. विवाह, घटस्फोट, दत्तक, वारसा यांसारख्या नागरी बाबींमध्ये सर्वांसाठी एकसमान नियम असतील तर समाजात न्याय आणि पारदर्शकता वाढेल. विविध धार्मिक कायद्यांमुळे निर्माण होणारी विसंगती आणि भेदभावही कमी होईल. काहींना असे वाटते की, यामुळे धार्मिक स्वातंत्र्यावर गदा येईल. मात्र हा युक्तिवाद पूर्णपणे चुकीचा आहे. कारण समान नागरी कायदा हा धर्माच्या श्रद्धा किंवा उपासनेशी संबंधित नसून नागरी व्यवहारांशी संबंधित आहे. त्याचा उद्देश कोणत्याही धर्माला कमी लेखणे नसून सर्व नागरिकांना समान न्याय मिळवून देणे हा आहे. स्त्री-पुरुष समानता हा आधुनिक लोकशाहीचा मूलमंत्र आहे. महिलांना वारसा, मालमत्ता, विवाह आणि कुटुंबीय संबंधांमध्ये समान हक्क मिळणे अत्यंत आवश्यक आहे. जेव्हा एखाद्या वैयक्तिक कायद्यात महिलांवर अन्याय होत असेल, तेव्हा त्या कायद्याचे पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक ठरते. समान नागरी कायदा लागू झाल्यास महिलांना न्याय मिळवण्यासाठी वेगळ्या संघर्षाची गरज उरणार नाही. याशिवाय, एकसमान नागरी कायदा देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेलाही बळकटी देऊ शकतो. सध्या आपल्या देशात प्रत्येक समुदायासाठी वेगळा कायदा आहे. असा प्रकार फक्त आपल्याच देशात आहे. विविध समुदायां-मध्ये वेगवेगळे कायदे असण्याऐवजी सर्वांसाठी समान नियम असतील तर नागरिकत्वाची समान भावना अधिक दृढ होईल. न्याय, समानता आणि बंधुता या संविधानातील मूल्यांना प्रत्यक्ष अर्थ प्राप्त होईल. सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेले मत हे केवळ कायदेशीर निरीक्षण नसून देशाच्या सामाजिक प्रगतीसाठी दिशादर्शक आहे. संसद आणि समाज या दोघांनीही या मुद्द्यावर खुलेपणाने विचार करण्याची गरज आहे. धार्मिक भावना जपताना संविधानातील समानतेच्या तत्त्वाला सर्वोच्च स्थान देणे आवश्यक आहे. म्हणूनच, भारतीय राज्यघटनेच्या मूल्यांनुसार प्रत्येक नागरिकाला समान हक्क मिळणे अत्यावश्यक आहे. स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक न्याय यासाठी समान नागरी कायदा हा प्रभावी मार्ग ठरू शकतो. विविधतेत एकता ही भारताची ओळख असली, तरी न्याय आणि समानता या मूल्यांवर आधारित एकसमान नागरी व्यवस्था हीच खऱ्या अर्थाने प्रगत आणि समतावादी समाजाची पायाभरणी करू शकते.

# विनोद सम्राट दादा कोंडके

आज १४ मार्च, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांचा स्मृतिदिन. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून म राठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई, वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहान-पणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले.



लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँडवाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली.

विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक-प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले.

१९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या.

सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली. तम ाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती. या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली. सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली. तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले. सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता.

दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली.

१४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# विज्ञानसम्राट हॉकिंग!

८ जानेवारी १९४२ म्हणजेच गॅलिलिओच्या ३०० व्या पुण्यतिथी वर्षी आणि न्युटनच्या जन्मानंतर बरोबर तीनशे वर्षांनी इंग्लंडमध्ये जन्मलेल्या स्टीफन हॉकिंग यांची लहानपणानापासूनच शास्त्रज्ञ व्हायची इच्छा होती. ८-९ वर्षाचे असतानाच ते घड्याळ आणि रेडिओ सारख्या वस्तू सहजपणे खोलत असत आणि त्या वस्तू कशा चालतात याचेही त्यांना ज्ञान होते. १९५९ मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठात विश्वउत्पत्ती शास्त्राचे संशोधन करण्यासाठी त्यांना प्रवेश मि ळाला आणि केम्ब्रिजला उच्च शिक्षण घेण्याचे त्यांचे स्वप्न साकारले. मात्र या दरम्यान हॉकिंग यांना मोटर न्यूरॉन या स्नायूच्या व्याधीने ग्रासले. लाखोत एकाला होणाऱ्या या आजाराने हॉकिंग केवळ दोन-चार वर्षे जगू शकतील, असा अंदाज डॉक्टरांनी वर्तविला होता. त्यामुळे निराश झालेल्या हॉकिंग यांना केम्ब्रिजमधील पुढील संशोधनात स्व-ारस्य उरले नाही. संशोधनाकडे पूर्ण दुर्लक्ष करून ते मृत्यूची प्रतीक्षा करू लागले. तथापि, हॉकिंग यांना झालेला रोग डॉक्टरांच्या अपेक्षेपेक्षा खूपच कमी वेगाने शरीरात पसरला. दरम्यान जानेव-ारी १९६३ मध्ये एका पार्टीमध्ये त्यांची जीन बिल्डे या मुलीशी ओळख झाली. पुढे ओळखीचे रुपांतर प्रेमात व विवाहात झाले. पत्नी जीन बिल्डे ने स्टीफन यांना निराशेच्या गर्तेतून बाहेरच काढले नाही तर नव्या आशा, नवी स्वप्ने दिल्यामुळे केवळ दोन वर्षांची मुदत मिळालेले स्टीफन हॉकिंग यांनी विज्ञानाच्या क्षेत्रात उंच भरारी मारली आणि साऱ्या जगाचे डोळे दिपून गेले.

विवाहानंतर चरितार्थासाठी नोकरीची गरज होती म्हणून अर्धवट सोडलेले शिक्षण त्यांनी जोमाने सुरु केले. १९७० साली त्यांनी विश्वनिर्मितीबाबतचे संशोधन जगापुढे मांडले आणि जगातील अग्रगण्य संशोधक, शास्त्रज्ञ म्हणून हॉकिंगची ख्याती सर्वदूर पसरली. खुर्चीला खिळून बसावे लागले असतानाही त्यांनी रॉजर पेनरोज यांच्यासोबत केलेल्या ब्लॅक



**आधुनिक युगातील न्यूटन म्हणून ओळखले जाणारे महान जगप्रसिद्ध विश्वरचनाशास्त्रज्ञ डॉ. स्टीफन हॉकिंग यांचा आज आठवा स्मृतिदिन. विश्वनिर्मिती, विश्वरचना, पुंजभौतिकी आणि कृष्णविवरावरील त्यांचे संशोधन मैलाचा दगड मानले जाते. ऐन उमेदीत 'मोटार न्युरॉन डिसीज' ही स्नायूची व्याधी जडलेल्या हॉकिंग यांनी मोठ्या जिद्दीने अपंगत्वावर विजय मिळवून ब्रम्हांडातल्या अनेक न उकलणाऱ्या गूढ रहस्यांचा शोध घेतला आणि असामान्य बुद्धीकौशल्याच्या जोरावर माणूस जग जिंकू शकतो हे साऱ्या जगाला दाखवून दिले. त्यांची जीवनकथा मोठी प्रेरणादायी आणि स्फुर्तीदायी आहे.**

होल संदर्भातील संशोधनापासून क्वांटम मेकॅनिक्समधील थिअरी मांडण्यापर्यंत जागतिक विज्ञान क्षेत्रात महत्त्वाचे संशोधन केले. त्यांनी मांडलेल्या व्यापक सापेक्षतावादाच्या सिद्धांतानुसार विश्वा-ची निर्मिती महास्फोटाने झाली अस-ावी (इळस लरपस ींहशेीू) व विश्वाचा शेवट हा महाचेप (इळस लीीपलह) ने कृष्णविवरात होईल असे भाकीत केले आहे. कृष्णविवरासंबंधी त्यांनी अनेक धक्कादायक सिद्धांत मांडले असून, त्यापैकी कृष्णविवरे कणांच्या रूपाने उर्जा बाहेर टाकत असतात ही त्यांची कल्पना शास्त्रज्ञांनी स्वीकारली नाही. तथापि, १९७४ साली हॉकिंग यांनी पहिल्यांदा शक्तिपुंज सिद्धांत आणि आणि सापेक्षतावादाच्या सिद्धांताची सांगड घालून कृष्णविवरांतून कण बाहेर पडतात हे सिद्ध करून शास्त्रीय जगतास चकित केले. अशी सांगड घालणे खुद्द आईनस्टाईनलाही जमले नव्हते आणि त्यानंतरच्या कोणत्याही शास्त्रज्ञाला हे शक्य झाले नाही. आधी जोरदार विरोध झालेल्या त्यांच्या या प्रबंधाला नंतर त्यांचे मत पटल्यावर त्यांच्या नव्या निष्कर्षाप्रमाणे होणाऱ्या किरणोत्सर्जनाला 'हॉकिंग उत्सर्जन' असे नाव देण्यात आले. त्याच वर्षी हॉकिंग यांचा कृष्णविवर या विषयावरील प्रबंध इंग्लंडच्या 'नेचर' या सुप्रसिद्ध नियतकालिकात प्रसिद्ध झाला आणि त्यांची रॉयल सोसायटीचा फेलो म्हणून निवड झाली. १९८० च्या दशकात हॉकिंग यांना ऑक्सफर्ड, प्रिन्स्टन, न्यूयॉर्क, लँकेस्टर आदी विद्यापीठांनी डॉक्टरेट देऊन त्यांचा सन्मान केला. विज्ञान विषयात संशोधनाचे काम करीत असतांनाच हॉकिंग यांनी अपंग लोकांसाठी, त्यांच्या सोयींसाठी आणि त्यांच्यावरील अन्यायासाठी लढा दिला. यासाठी हॉकिंग यांना १९७९ साली ठूश्र 'ीलळरींळेप षी ऊळीरलळश्रळीं रपव ठशहरलळश्रळींरींळेप या संस्थेकडून 'मॅन ऑफ दि इयर' हा मानाचा किताब देण्यात आला.

डॉ. स्टीफन हॉकिंग यांनी 'काळाचा संक्षिप्त इतिहास' ( brief history of time) या पुस्तकात भौतिक विज्ञान, खगोलशास्त्र, विश्वरचना आदी विषयातील अत्याधुनिक संशोधनाचा अत्यंत सोप्या भाषेत आढावा घेतला असून इंग्रजीतील सर्वाधिक खपलेल्या बायबल, शेक्सपिअर या पुस्तकांच्या जोडीने त्याची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये नोंद झाली आहे. जगातील ३३ भाषामध्ये ते अनुवादित झाले असून एकट्या इंग्लंडमध्ये या पुस्तकाच्या ४० पेक्षा जास्त आवृत्ती प्रकाशित झाल्या आहेत. विश्वाच्या स्फोटाच्या वेळीच स्थळ आणि काळ यांची निर्मिती झाली असल्याचे सांगून विश्वनिर्मितीची कहाणी त्यांनी या पुस्तकात कथन केली आहे. या पुस्तकामध्ये विश्वनिर्मिती, त्यानंतरच्या विश्वाच्या वाटचालीची आणि विश्वाच्या अंताची चर्चा केली असून पुस्तकातील विषय इतका गहन आहे की, 'जगातील जास्तीत जास्त लोकांनी विकत घेतलेले; पण कमीत कमी लोकांनी वाचलेले आणि वाचलेल्यांपैकी कमीतकमी लोकांना समजलेले' असे या पुस्तकाचे विनोदाने वर्णन केले जाते.

इंग्लंडच्या केम्ब्रिज विद्यापीठातील गणित विभागाचे शास्त्रज्ञ म्हणून त्यांनी काम केले असून एके काळी ज्या खुर्ची-वर सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ सर आयझाक न्यूटन बसले होते, ते मानाचे पद हॉकिंग यांनी भूषविले होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या जगप्रसिद्ध शास्त्रज्ञाला चालता, बोलता येत नव्हते. त्यांच्या मेंदूने सर्व स्नायू वरील नियंत्रण हरवले होते. त्यांना श्वासोच्छ्वास सुद्धा यंत्राच्या सहाय्याने घ्यावा लागत होता. चाकाच्या खुर्चीत बसून संगणकाच्या सहाय्याने ते आपले विचार व्यक्त करीत. काही वर्षापूर्वी हॉकिंग यांनी 'पृथ्वीचा सर्वनाश अटळ असून, लवकरच पृथ्वीवरील मानवाला दुसऱ्या एखाद्या ग्रहावर आश्रय घ्यावा लागेल' असे प्रतिपादन केले होते. ब्रम्हांडातील अनेक गुढ रहस्यांची उकल करणाऱ्या या शास्त्रज्ञाला जेव्हा एका मुलाखतीत 'विश्वातील सर्वात गुढ गोष्ट कोणती ?' असा प्रश्न विचारला होता, तेव्हा 'स्त्री' ही जगातील सर्वात गूढ गोष्ट असल्याचं मत त्यांनी मांडलं होतं. आईन्स्टाईन या सापेक्षतावादाच्या जनकाचे नाव जगभर सर्वमुखी आहे. तथापि, हॉकिंग यांना २१ व्या शतकातील आईनस्टाईन म्हंटले जाते. योगायोग असा की, १४ मार्च १८७९ ला आईनस्टाईन यांचा जन्म झाला आणि २०१८ च्या १४ मार्चलाच हॉकिंग यांनी जगाचा निरोप घेतला. अशा या ख्यातनाम विश्वरचना शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांचे जीवनचरित्र सर्वांनाच स्तिमित करणारे व प्रेरणादायी आहे. त्यांच्या आठव्या स्मृतिदिना-निमित्त त्यांना विनम्र आदरांजली!

**-प्रा. व्ही. व्ही. कोष्टी,**
शिपूर, जि.सांगली
मो. ९४२३८२९११७

# नात्यातील माणुसकीचा ओलावा

प्रशस्त, देखणे, टुमदार, सर्व सोयीसुविधांनी युक्त घर आहे; पण त्या घराला घरपणच उरलेले नाही. सोन्यासारखी माणसे आहेत. आई, बाबा, भाऊ, बहीण पत्नी, मूलंबाळ सगळी-सगळी नाती आहेत. पण त्या नात्यात ओलावाच उरला नाही. प्रत्येक नात्यात ओलावा असावा, तो तसाच टिकून राहावा यासाठी कुणी प्रयत्नही करत नाही. प्रत्येकाच्या डोक्यात एकच विचार मला काय गरज आहे....? माझ्याकडे सगळं काही आहे; मला कोणाचीही गरज नाही. पण लक्षात घ्या हा भ्रम आहे.. निव्वळ भ्रम... हे वेळोवेळी सिद्ध झालंय.... कसला पैसा...?... कुणाची धनदौलत...? कुठला मान-सन्मान...? कुठली पद, प्रतिष्ठा...? कसली स्थावर-जंगम मालमत्ता...?कशाची प्रसिद्धी...? कुठला बढेजावपणा...? एवढे सगळे मिळाले म्हणजे आयुष्य सुखी आणि समृद्ध झाले असे नाही. किती आणि कुठंपर्यंत या सर्वांचा उपयोग...? या सर्वांपेक्षाही आयुष्यात आणखीन काही महत्त्वाचे असते....? भौतिक सुखाने सुख मिळाल्याचा केवळ आभास निर्माण होतो. प्रत्यक्ष समाधान मिळत नाही.



सुख, समाधान, आनंदासाठी आपल्या माणसांचे प्रेम, माया, ममता, आपुलकी, वात्सल्य आणि त्यांचा आनंददायी सहवासच आवश्यक असतो. पैसा, धनदौलत, प्रतिष्ठा मानसन्मान तुम्हाला समजून घेऊ शकत नाही. तुमच्या डोक्यावरून मायेने हात फिरवू शकत नाही. तुम्हाला कुरवाळू शकत नाही. तुम्हाला कुशीत घेऊ शकत नाही. तुमचे दुःख समजून घेऊ शकत नाही. तुमच्या वेदना त्यांना कळत नाहीत. त्यासाठी आपली माणसेच लागतात.

अभिमान वाटावा असं एक तरी नातं हवं.... ज्याच्या खांद्यावर डोकं ठेवलं की अक्षरशः बांध फुटावा.... कुणाजवळ तरी हंबरडा फोडून रडता यावं... कुणाला तरी सगळं सुख-दुःख सांगता यावं....आयुष्यात कोणीतरी हवं त्याचं सगळं ऐकून घ्यावं आणि ज्याला आपलं सगळं काही सांगावं... कोणीतरी हवं ज्याला आपलं असणं हवंहवंस वाटावं. ज्याला आपलं रुसणं नकोसं वाटावं. आपण आनंदातच राहावं. आपल्या आयुष्यात दुःख येऊच नये आणि आलेल्या दुःखाला सामोरे जाण्याचे धैर्य त्यांनी आपल्याला द्यावं. आपल्या असण्याचा ज्याच्यावर फरक पडावा. आपल्या नसण्याने ज्याला विरह वाटावा. अशी हक्काची जिवाभावाची माणसं आपलं दुःख समजू शकतात. आपल्याला समजू शकतात. या सगळ्या समजून घेण्यामुळेच आपण सुखी, समाधानी, आनंदी राहू शकतो. कशासाठी जगतो आहोत आम्ही? आणि कुणासाठी जगतो आहोत आम्ही? या दोन प्रश्नांची उत्तरे अगदी मध्यरात्री जरी कोणी विचारली तरी ती सांगता यावीत.. या प्रश्नांची उत्तरे सापडली नाहीत; तर मात्र माणूस नाईलाजाने आत्महत्येकडे वळतो. आजच्या धावपळीच्या एकविसाव्या शतकात माणसाचे जीवन कसे झाले आहे. यावरील एक सुंदर कविता आठवते. कुणाची आहे माहीत नाही, पण छान आहे.

आऊटडेटेड झाले आयुष्य सारं
स्वप्नही डाऊनलोड होत नाही
संवेदनांना व्हायरस लागलाय
दुःख सेंड करता येत नाही
जुने पावसाळे उडून गेलेत
डिलीट झालेल्या फाईल्ससारखे
आणि घर आता शांत असतं
रेंज नसलेल्या मोबाईल सारखे
हँग झालेल्या पीसी सारखी
मातीची स्थिती वाईट
जाती माती जोडणारी
कुठेच नाही वेबसाईट
एकविसाव्या शतकातील
पीढी भलतीच क्युट
कॉन्टॅक्ट लिस्ट वाढत गेली
संवाद झाले म्युट
कम्प्युटरच्या चीप सारखा
माणूस मनानं खुजा झालाय
अन मदर नावाचा बोर्ड त्याच्या
आयुष्यातून वजा झालाय
फ्लॉपी डिस्क ड्राइव्हमध्ये
आता संस्कारांनाच जागा नाही
फाटली मने सांधणारा
इंटरनेटवर धागा नाही
विज्ञानाच्या युगातील
केवढी मोठी चूक
रक्ताच्या नात्यांनाही लागते
व्हाट्सअप आणि फेसबुक

एका घरात राहत आहोत पण संवाद विसरत चाललो आहोत. हे केवढे दुर्भाग्य आहे. कुटुंबातील माणसे आहेत ; पण कोणत्या न कोणत्या कारणामुळे एकमेकापासून दुरावलेली आहेत. नातेवाईक भरपूर आहेत तरीदेखील अभिमान वाटावा असे एकही नातं नाही. प्रत्येक जण आपापल्या तोऱ्यात, गर्वात, अहंकारात मीपणात काठोकाठ बुडाला आहे. ढीगभर मित्र आहेत पण मन मोकळे करावे असा एकही नाही. अंत:करण मोकळे करावे. हृदयात साठलेल्या सगळ्या वेदना दाखवाव्यात. काळजाला टोचणाऱ्या गोष्टी सांगाव्यात. मनाच्या वेदनादायी जखमांवर फुंकर घालावी. खदखदून हसावे. रडून एकदाच मोकळे व्हावे. असा एकही कुटुंबातील सदस्य, एकही नातेवाईक आणि एकही मित्र नसणे. म्हणजे आपल्या जीवनाचं सर्वात मोठे अपयश आहे.

सांगु कशी कुणाला, कळ आतल्या जीवाची
चिरदाह वेदनेचा, मज शाप हाच आहे

**-मयूर मधुकरराव जोशी**
विठ्ठल रुक्मिणी नगर,
जिंतूर, जि. परभणी.
मो. ९७६७७३३५६०

# राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रभावी व्यासपीठ -कुलसचिव डॉ. डी. डी. पवार




**नांदेड (प्रतिनिधी)** –राष्ट्रीय सेवा योजना (NSS) म्हणजे केवळ एक उपक्रम नसून विद्यार्थ्यांना समाजाशी जोडणारी आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणारी एक महत्त्वाची चळवळ आहे, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. डी. डी. पवार यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे धनगरवाडी येथे दि. ५ ते ११ मार्च दरम्यान आयोजित विशेष वार्षिक युवा शिबिराच्या समारोप प्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

डॉ. पवार म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांना 'नॉट मी बट यू' (मी नव्हे, तर तू) या तत्त्वावर आधारित समाजाभिमुख जीवनाची शिकवण देते. शिबिरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील वास्तव समस्यांची जवळून ओळख होते आणि त्यामुळे त्यांच्यात सामाजिक जाणीव अधिक प्रगल्भ होते.

एनएसएसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण, व्यवस्थापन कौशल्य आणि समाजसेवेची भावना विकसित होते. स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना कमी संसाधनांमध्ये प्रभावी काम कसे करायचे याचे प्रशिक्षण मिळते. गावागावांत उभारलेल्या शौचालयांच्या मागेही एनएसएस स्वयंसेवकांचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले.

समाजपरिवर्तनासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी शिबिरातील सात दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा देतात, असे मत व्यक्त केले. कोरोनानंतर विद्यार्थ्यांचा सामाजिक कार्यातील सहभाग काही प्रमाणात कमी झाल्याची खंत व्यक्त करत तरुणांनी अशा उपक्रमांत अधिक सक्रिय व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी शिबिरार्थी पूजा हिने गेल्या सात दिवसांतील अनुभव कथन करताना बंधारा बांधणे, ग्रामस्वच्छता, ग्रामस्थांशी संवाद तसेच दररोजच्या अभ्यासपूर्ण व्याख्यानांमुळे गावाशी एक वेगळी नाळ जुळल्याची भावना व्यक्त केली. या कार्यक्रमाला दूरशिक्षण विभागाचे संचालक डॉ. प्रकाश निहलानी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एनएसएस संचालक मारोती गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन माध्यमशास्त्र संचालक तथा एनएसएस समन्वयक प्रा. डॉ. सुहास पाठक यांनी केले, तर प्रा. गिरीश जोंधळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## आ. चिखलीकर यांच्या उपस्थितीत आज महाराजस्व अभियान

**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानांतर्गत ७ मार्च ते ८ मे या काळात सर्कलनिहाय समाधान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. शनिवार, दि. १४ मार्च रोजी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत लोहा तालुक्यातील कलंबर बु. येथील सिद्धेश्वर मंगल कार्यालयात सकाळी दहा वाजता अभियानाला सुरुवात होणार आहे.



यावेळी उपविभागीय अधिकारी विलास नरवटे, तहसीलदार विठ्ठल परळीकर, बीडीओ कुलकर्णी व सर्व विभाग प्रमुख उपस्थित राहणार आहेत. तेव्हा या कलंबर सर्कलमधील सर्व गावांच्या नागरिकांनी अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महसूल विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

शासकीय कार्यालयात हेलपाटे न घालता, नागरिकांना त्यांच्या हक्काचे दाखले, कागदपत्रे आणि योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळावा हा या शिबिराचा मुख्य उद्देश आहे. 'शासन आपल्या दारी' या योजनेला बळकटी देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

लोहा तालुक्यात ७ मार्च ते ८ मे २०२६ या कालावधीत मंडळनिहाय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कलंबर बु. येथे शनिवार, दि. १४ मार्च रोजी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सामान्य जनतेच्या तक्रारींचे निवारण शासनाच्या विविध कल्याणकारी योजना थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी तहसील प्रशासनाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर टप्पा १ चे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर सकाळी दहा वाजता कलंबर बु येथील सिद्धेश्वर मंगल कार्यालयात होणार आहे.

या शिबिरात प्रमुख सेवा विविध दाखले वाटप, सात- बारा अद्ययावत करणे, प्रलंबित फेरफार निकाली, ई-मोजणी पाणंद रस्त्याबाबत कार्यवाही, अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क ॲग्रिस्टक, पी.एम. किसान, तुकडेबंदी कायद्याच्या अनुषंगाने कार्यवाही, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचा लाभ, लोकसेवा हक्क कायदा तात्काळ सेवा इतर अनुषंगिक विषय या बाबत निराकरण केले जाणार आहे.

# शेवटच्या चेंडूत विदर्भ क्रिकेट संघाचा विजय तर दुसऱ्या सामन्यात मुंबई संघ विजयी

**नांदेड (प्रतिनिधी)** –वेस्टन्स क्रिकेट असोसिएशन्स फॉर महाराष्ट्र आयोजित वेस्ट झोन वेस्टन्स टी-२० क्रिकेट सामन्याचे उद्घाटन नांदेड येथील श्री गुरू गोविंदसिंघजी स्टेडियम येथे दि. १२ मार्च रोजी करण्यात आले. पहिल्या दिवशी सकाळच्या सत्रात गोवा विरूद्ध विदर्भ या दोन क्रिकेट संघात सामना होऊन विदर्भाच्या संघाने शेवटच्या चेंडूवर रन काढून विजय मिळवला. तर दुपारच्या सत्रात मुंबई विरूद्ध महाराष्ट्र या संघाचा सामना होऊन मुंबई या संघाने यात विजय मिळवला.

नांदेड येथील श्री गुरू गोविंदसिंघजी स्टेडियम येथे वेस्ट झोन वेस्टन्स टी-२० क्रिकेट सामन्यांना मोठ्या उत्साहात सकाळी प्रारंभ झाला. या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला संघटनेचे उपाध्यक्ष नंदू कुलकर्णी, नांदेड क्रिकेट असोसिएशनचे सचिव अशोक तेरकर, सहसचिव रतन आणि ज्येष्ठ क्रिकेटपटू शाम आडे, जोंधळे, राज गायकवाड, लक्ष्मण खाडे, महंमद आरीफ, राजू किवळेकर, वेस्टन्स क्रिकेट असोसिएशन्स फॉर महाराष्ट्राचे टीम मॅनेजर तथा कोच महंमद फहीम आणि टुर्नामेंट कमिटीचे अध्यक्ष श्रीकांत जाधव तसेच पुणे येथील स्पर्धा आयोजन समितीचे सदस्य उपस्थित होते.

सामन्याची सुरूवात राष्ट्रगीताने करण्यात आली. यात विदर्भाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. गोवा संघाने ८ गडी बाद १७५ धावा काढल्या. यामध्ये या संघाचे कर्णधार साहील यांनी ४९ चेंडूत ७६ धावा काढल्या. संदीप डीएम यांनी २८ चेंडूत ३२ धावा काढल्या, सिद्धेश प्रभूने तडाखेबाज फलंदाजी करीत १७ चेंडूत ५० धावा काढल्या. यात त्यांनी ५ चौकार व ४ षटकार लगावून नॉटआऊट राहिले. विशाल भगत, प्रशांत, अनुप यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. तर प्रतिस्पर्धी विदर्भ क्रिकेट संघाने १७५ धावांचे लक्ष केंद्र करीत सामन्याच्या शेवटच्या चेंडूवर धाव काढीत १७६ धावा काढून रोमहर्षक विजय मिळवला. ९ गडी बाद झाले होते. या संघात मंगेश समुद्रेकर ४० धावा, अनुप ३१ धावा, शलभ श्रीवास्तव २२ धावा, परिक्षितने ३७ धावा काढल्या तर गोवा क्रिकेट संघातील खेळाडू मदार बसप्पा, सुधीर सावल, साहील यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. या सामन्यात विदर्भ क्रिकेट संघाचा अनुप फुलपगार यांना मॅन ऑफ द मॅचचा पुरस्कार मिळाला.

दुपारच्या सत्रात मुंबई विरूद्ध महाराष्ट्र असा सामना होऊन मुंबई हा संघ विजयी झाला. प्रथम फलंदाजी महाराष्ट्र संघाने करीत २० षटकात ९ बाद १३४ धावा काढल्या. यात अजय जाधव यांनी ३४ चेंडूत ७३ धावा काढून ते नाबाद राहिले. तसेच विठ्ठल खल्लाळ यांनी २५ चेंडूत २० धावा काढून नाबाद राहिले. बॉलर संजयराज महाडिक यांनी ४ षटकात २२ धावात ३ बळी घेतले. रविराज धुरी यांनी २ बळी घेतले. राज माही यांनीही २ बळी घेतले. तर मुंबई क्रिकेट संघाने १५ ओव्हर २ बॉलमध्ये १३५ धावा काढून व ६ विकेट राखीत विजय संपादन केला. राज माही यांनी १८ चेंडूत २४ धावा, दीपक आचारी यांनी २१ चेंडूत ३१ धावा, शेख सादिक, गोपाळ गुरखुदे, विठ्ठल खल्लाळ यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. सामनावीर राज माही हे ठरले. सदर सामने १५ मार्चपर्यंत दोन सत्रात पार पडत आहेत.

# दिव्यांग लाभार्थ्यांनी २५ मार्चपर्यंत यूडीआयडी कार्ड सादर करावे -तहसीलदार संजय वारकड

**नांदेड (प्रतिनिधी)** –संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या नांदेड तालुक्यातील ग्रामीण भागातील दिव्यांग लाभार्थ्यांनी आपले दिव्यांग प्रमाणपत्र (UDID कार्ड) २५ मार्च २०२६ पर्यंत तहसील कार्यालयात सादर करावे, असे आवाहन तहसीलदार संजय वारकड यांनी केले आहे. निर्धारित कालावधीत कागदपत्रे सादर न केल्यास अनुदान मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नांदेड तालुक्यात सध्या या योजनेअंतर्गत एकूण १ हजार २०७ दिव्यांग लाभार्थी लाभ घेत असून, त्यांना शासनाकडून दरमहा २ हजार ५०० रुपये अनुदान दिले जाते. मात्र, प्रशासकीय नोंदीनुसार यापैकी ८३३ लाभार्थ्यांनी अद्याप 'युनिक डिसॅबिलिटी आयडेंटिटी कार्ड' तहसील कार्यालयात जमा केलेले नाही.

लाभार्थ्यांच्या सोयीसाठी कागदपत्रे जमा करण्यासाठी दोन पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. लाभार्थ्यांनी आपले UDID कार्ड व आधार कार्डची झेरॉक्स आपल्या गावातील तलाठी यांच्याकडे जमा करावी किंवा थेट तहसील कार्यालयातील संजय गांधी निराधार योजना विभागात सादर करावी. यासाठी तहसील कार्यालयात स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

शासनाच्या नियमानुसार लाभार्थ्यांची पडताळणी करणे आवश्यक असल्याने दिव्यांग लाभार्थ्यांनी आपले UDID कार्ड व आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करावीत, जेणेकरून अनुदानाचा लाभ विनाव्यत्यय सुरू राहील, असेही तहसीलदार संजय वारकड यांनी सांगितले.

## आज रामतीर्थ येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचा' पहिला टप्पा

**शंकरनगर (प्रतिनिधी)** – महसूल मंडळ रामतीर्थ यांच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल स्वसमाधान शिबिराचा पहिला टप्पा' दि. १४ मार्च रोजी सकाळी १० वाजता रामतीर्थ येथे आयोजित करण्यात आला आहे.

रामतीर्थ मंडळातील रामतीर्थ, हिप्परगा माळ, किनाळा, कामरसपल्ली, चिटमोगरा, अटकळी, टाकळी खुर्द, डोणगाव बु., पाचपिंपळी, रामपूर मजरा, केरूर, बिजूर, डोणगाव खुर्द या परिसरातील शेतकरी, विद्यार्थी, नागरिक व गरजू व्यक्तींनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे व महसूल प्रशासन बिलोली व मंडळ अधिकारी कल्पना मुंडकर व तलाठी विजय पाटील जाधव यांनी केले आहे.

# विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन मटका बुक्कीवर कारवाई

## दीड लाखांचा मुद्देमाल जप्त, २५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहर आणि जिल्ह्यात कुठलाही अवैध धंदा चालणार नाही याची खबरदारी संबंधित ठाणे प्रमुखांनी घ्यावी, असे सक्त आदेश पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप आणि पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिले आहेत. यावरून विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत चालणाऱ्या दोन मटका बुक्कीवर पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे यांच्या पथकाने कारवाई करून तब्बल दीड लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी २५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

शहराच्या विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत आनंदनगर परिसरातील ठाकरे कॉम्प्लेक्समध्ये श्रावण गणेशराव इंदूरकर हा आपल्या इतर दहा साथीदारांसोबत मधुर मॉर्निंग नावाचा मटका जुगार खेळत व खेळवीत होता. ही माहिती शेंडगे यांना मिळाली. त्यांनी आपले वरिष्ठ उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने यांना सांगून त्या ठिकाणी पोलीस उपनिरीक्षक सचिन शिंदे यांना सोबत घेऊन कारवाई केली. यावेळी मटका बुक्कीवरून नगदी ५१ हजार ९४० रुपये व ४७ हजार रुपये किमतीचे चार मोबाईल आणि ११ जुगाऱ्यांना अटक केली. पोलीस उपनिरीक्षक सचिन शिंदे यांच्या फिर्यादीवरून श्रावण इंदूरकर रा. चौफाळा नांदेड, श्रीयश जुगल मंडले रा. रविनगर कौठा, काबलीया हनुमान चुडामन रा. गोर्वधनघाट नांदेड, दीपक भगवान बंडे रा. मगनपुरा नांदेड, नानकसिंग ठाकूरसिंग पाठनुरवाले रा. नंदीग्राम सोसायटी नांदेड, मुंजाजी गणपती नरवाडे रा. नेरली, गणेश सखाराम जाधव रा. ताजनगर नांदेड, लिंगुराम सायन्ना गटलेवार रा. देशमुख गल्ली तरोडा खु. नांदेड, बाबुराव सयाजी उस्कीलवार रा. हनुमानगड नांदेड, नवल हनुमान यादव रा. रवीनगर कौठा, मटका मालक कमल यादव रा. दिलीपसिंग कॉलनी नांदेड अशा ११ जणांविरुद्ध विमानतळ ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राष्ट्राच्या जडणघडणीत महिलांचे मोठे योगदान -प्रा. डॉ. आर. डी. देशमुख

**नांदेड (प्रतिनिधी)**– राष्ट्राच्या जडणघडणीत महिलांचे प्राचीन काळापासून मोठे योगदान राहिले आहे. महिला सर्वप्रथम अन्नपूर्णा आहे, ती एक शक्ती आणि प्रेरणा आहे. आज महिला उच्च शिक्षण घेऊन सर्व क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करत आहे. ही देशाची शान आहे. महिलांनी आपल्या नाती जपत संधीचे सोनं करावे. विशेष म्हणजे महिलांचे कार्य अत्यंत विश्वासनीय असते, असे प्रतिपादन प्रा. डॉ. आर. डी. देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले.

गोदावरी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. नांदेडच्या वतीने नुकतेच जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बँकेचे चेअरमन प्रा. डॉ. आर. डी. देशमुख हे होते. याप्रसंगी बँकेचे संचालक प्रा. डॉ. मनीषा देशमुख, संधू अमरजीत कौर, कांचन परिहार, मेघा पतंगे, अमृता सोलंकर आदींचा शाल व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला.

महिला दिनाच्या निमित्ताने संचालक प्रा. डॉ. सुधीर टाले, प्रा. प्रभाकर जाधव, डॉ. सायन्ना मठमवार यांनी आपले विचार मांडले. तसेच सत्कारमूर्ती कांचन परिहार, प्रा. डॉ. मनीषा देशमुख, संधू अमरजीत कौर आणि अमृता सोलंकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व संचालन प्रा. डॉ. जी. टी. वाघमारे यांनी केले तर आभार व्यवस्थापक राम कल्याणकर यांनी मानले.

# जागतिक महिलादिनानिमित्त महिला आरोग्य शिबीर संपन्न



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिडको येथील महात्मा गांधी डीएड, बीएड व एमएड कॉलेज नांदेडच्या वतीने जागतिक महिला दिन व सावित्रीबाई फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त महिला आरोग्य शिबीर व विविध स्पर्धा नुकत्याच पार पडल्या.

यावेळी आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट महाराष्ट्र येथील सुचित्रा भगत यांनी महिलांना मार्गदर्शन केले. महिलांनी आरोग्याची काळजी घ्यावी व वेळेवर आहार-विहार आणि उपचार घ्यावा व स्वतः ला सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्न करावे, असे सुचित्रा भगत यांनी सांगितले.

कार्यक्रमासाठी महात्मा गांधी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक येसळवाड, सावित्रीबाई फुले बीएड कॉलेजच्या प्रा. डॉ. आम्रपाली भद्रे, प्रा. प्रतीक्षा तालंगकर तसेच महात्मा गांधी डीएड, बीएड व एमएड कॉलेज सिडको नवीन नांदेड येथील प्रा. डॉ. स्नेहल थोरात, प्रा. मनीषा सोनकांबळे, प्रा. बेग एन. एफ, प्रा. राजेश पाईकराव, प्रा. अक्षय जाधव, दुर्गा कुलकर्णी, शीला पवार व ताईबाई पवळे इत्यादी प्राध्यापक व महिला कर्मचारी उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रा. शिवानंदा पत्रे यांनी केले. या कार्यक्रमात सर्व महिला प्राध्यापिका, महिला कर्मचारी व विद्यार्थिनींचा प्राचार्य डॉ.सुरेश घुले यांच्या हस्ते सर्व महिलांना सावित्रीबाई फुले यांचे चरित्र पुस्तक व पेन देऊन सत्कार करण्यात आला.

## श्रीवासवी अर्बन पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध

**हदगाव (प्रतिनिधी)**– नांदेड येथील वासवी भवन येथे महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेची एक बैठक होऊन तीत श्री वासवी अर्बन सहकारी पतसंस्था लि. नांदेडच्या अध्यक्षपदी गोविंदराव बिडवई तर उपाध्यक्षपदी सदानंद मेडेवार यांची सर्वानुमते निवड घोषित करण्यात आली.

नवनिर्वाचित अध्यक्ष बिडवई यांनी सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल आभार मानत संस्थेच्या आर्थिक बळकटीसाठी व सभासदांना अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. उपाध्यक्ष मेडेवार यांनीही संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी संचालक मंडळ व सभासदांच्या सहकार्याने कार्य करण्याची ग्वाही दिली.

वासवी अर्बन बँकेच्या संचालकपदी विजय पांपटवार, शंकर देबडवार, शंतनू कोटगिरे, बिपिन गादेवार, प्रल्हाद कासेटवार, विजयकुमार कुंचनवार, राजू मोतेवार, कल्याण पाटील, प्रदीप मनाठकर, सौ. मेघा मनाठकर, सौ. सपना नलबलवार, ज्ञानेश्वर लोकमनवार, मधुकर नल्लावार, रवींद्र बंडेवार, डॉ. व्यंकटेश डुबे यांची सर्वानुमती निवड करण्यात आली.

या बैठकीस महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर महाजन, सल्लागार एकनाथराव मामडे, नांदेड जिल्हा ग्रामीणचे अध्यक्ष प्रभाकरराव पत्तेवार, शिरीष मनाठकर, डॉ. रमेश तुप्तेवार, संघटन प्रमुख प्रदीप कोकडवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ही निवड घोषित करण्यात आली.

# नांदेड परिमंडलात जागतिक महिलादिन साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)** – महावितरणच्या नांदेड परिमंडल कार्यालयात नुकताच जागतिक महिला दिन उत्साहात विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजनाने कार्यक्रमास प्रारंभ झाला.

पायाभूत आराखडा विभागाच्या अधीक्षक अभियंता श्रीमती निधी गौतम अध्यक्षस्थानी असलेल्या समारंभास मुदखेड ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ. वृशाली कळसकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. समारंभास मानव संसाधन विभागाचे सहायक महाव्यवस्थापक प्रदीप सातपुते हेही व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी प्रदीप सातपुते यांच्यासह श्रीमती निधी गौतम, डॉ. कळसकर यांनी महिलांच्या आरोग्यविषयक समस्या आणि आहार या विषयावर उदबोधक मार्गदर्शन केले तर निधी गौतम यांनी महावितरणसह इतर अनेक विभागातील महिला सकारात्मक प्रेरणेने ऊर्जित होऊन पूर्णक्षमतेने भरीव कामगिरी करीत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमादरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रभारी उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी एम.एस.सदावर्ते, मिलिंद कांबळेसह उप कार्यकारी अभियंता सौ. किरण देशमुख, श्रीमती डी.पी.कंठेवाड, कविता कांबळे, सारिका चौधरी, दुर्गा कुलदिपके, ज्योती स्वामी, सहायक अभियंता ज्योती कापशीकर, सुधा जोंधळे, रेखा लोणे, शोभा येळणे, आदी महिला अधिकारी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास सुमारे सव्वाशे ते दीडशे महिला कर्मचारी उपस्थित होत्या.

# अहिल्यादेवी महिला ज्येष्ठ नागरिक संघाला राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार प्रदान



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– येथील अहिल्यादेवी महिला ज्येष्ठ नागरिक संघाला राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार नाशिक येथे नुकताच प्रदान करण्यात आला.

अहिल्यादेवी महिला ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षा भागीरथी मारोतराव बच्चेवार यांना राज्यस्तरीय प्रथम पारितोषिक सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

दर तीन वर्षाला होणारे राज्यस्तरीय ज्येष्ठ नागरिक संघाचे अधिवेशन नाशिक येथील गायकवाड सभागृहात ८ व ९ मार्च रोजी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट व ज्येष्ठ नागरिक संघटनेचे राज्य अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे, उपाध्यक्ष अशोक तेरकर, महिला आघाडीच्या राज्य अध्यक्ष डॉ. निर्मला कोरे, सचिव महामुने, माजी सचिव जयवंत सोमवाड, सुनिता तेरकर यांच्यासह उतर मराठवाडा विभागीय अध्यक्ष डॉ. हंसराज वैध, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्त्रीचे आरोग्य हाच तिच्या आत्मविश्वासाचा पाया -डॉ. सदावर्ते

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्र आणि रसायनशास्त्र संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्त्या म्हणून प्रसिद्ध व्याख्यात्या डॉ. उज्ज्वला सदावर्ते उपस्थित होत्या.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. उज्ज्वला सदावर्ते यांनी महिलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर विशेष भर दिला. त्या म्हणाल्या की, स्त्रीचे शारीरिक आरोग्य हा तिच्या आत्मविश्वासाचा पाया असतो. पौगंडावस्था ते रजोनिवृत्तीपर्यंत शरीरात होणारे बदल समजून घेत महिलांनी स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. व्यायाम आणि संतुलित आहार हा पर्याय नसून जीवनाचा आवश्यक भाग आहे, असे त्यांनी सांगितले.

महिलांच्या बहुआयामी भूमिकांवर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, स्त्रीने सर्व नातेसंबंधांच्या पलीकडे जाऊन स्वतःला स्वतंत्र व्यक्ती म्हणून ओळखले पाहिजे. स्वतःचे छंद जोपासावेत आणि कोणतेही काम ओझे न समजता आनंदी वृत्तीने करावे, असा सल्लाही त्यांनी दिला. यावेळी त्यांनी स्वरचित कविता, गीते आणि भारुड सादर करून उपस्थितांचे प्रबोधन केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात रसायनशास्त्र संकुलाच्या संचालिका डॉ. संगीता माकोने यांनी महिला सक्षमीकरणाबाबत आपले विचार मांडले. महिलांनी एकमेकींशी स्पर्धा करण्याऐवजी स्वतःशीच स्पर्धा करावी. परस्पर सहकार्य आणि एकजूट हीच महिलांची खरी ताकद असून, ती समाजाला सकारात्मक दिशा देणारी ठरते, असे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाच्या निमित्ताने दोन विशेष उपक्रम राबवण्यात आले. काव्यदर्शन या उपक्रमांतर्गत डॉ. ज्ञानेश्वर वानखेडे यांच्या कवितांच्या भित्तीपत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तसेच रसायनशास्त्र संकुलातील प्रथम वर्षातील गुणवंत विद्यार्थिनींचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थितांचे आभार डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. सुनिता पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाला रसायनशास्त्र संकुलातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेतील पात्र-अपात्र यादी जाहीर; त्रुटी पूर्ततेसाठी १३ मार्चपर्यंत मुदत


**नांदेड (प्रतिनिधी)** –पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येणाऱ्या राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजना २०२५-२६ अंतर्गत जिल्ह्यातील अर्जांची छाननी पूर्ण करण्यात आली असून, पात्र व अपात्र लाभार्थ्यांची यादी जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी यांनी दिली आहे.

सदर योजनेअंतर्गत प्राप्त अर्जांची छाननी पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडून करण्यात आली. या छाननीदरम्यान काही अर्जांमध्ये अपूर्ण कागदपत्रे, निकषांची पूर्तता न होणे आदी कारणांमुळे काही अर्ज अपात्र ठरविण्यात आले आहेत. छाननीनुसार नांदेड जिल्ह्यातील एकूण ६३५ अर्जांपैकी ४७७ अर्ज पात्र तर १५८ अर्ज अपात्र ठरले आहेत. अपात्र लाभार्थ्यांची कारणासहित सविस्तर यादी विभागाच्या संकेतस्थळावर तसेच सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली आहे, जेणेकरून संबंधित अर्जदारांना आवश्यक त्रुटी दुरुस्त करण्याची संधी मिळू शकेल.

त्रुटी पूर्ततेसाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्यात आला असून, ४ मार्च २०२६ रोजी पात्र-अपात्र यादी जाहीर केली आहे. अपात्र अर्जदारांना १३ मार्चपर्यंत आवश्यक कागदपत्रे सादर करून त्रुटी दूर करण्याची संधी दिली आहे. त्यानंतर १६ मार्च रोजी सुधारित यादी तयार केली जाईल आणि १८ मार्च रोजी अंतिम पात्र यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे, असे कळविण्यात आले आहे.

CMYK

# अंतर्मन



## तुम्हाला जी गोष्ट नकोय, ती व्यक्तच करू नका...

# अपयश टाळण्याचे महत्त्वाचे सूत्र...

**सर्व सुखसोयी आणि सुविधांनी युक्त आलिशान घरात बसलेला निराश, थकलेला माणूस स्वतःच्या विचारांनी लवकर पराभूत होऊ शकतो. अशा परिस्थितीत आशेचा किरण यशासाठी एक शक्तिशाली चुंबक आहे. आशा टिकवून ठेवण्यासाठी, एखाद्याने नेहमी महापुरुषांच्या शिकवणींचे पालन केले पाहिजे. महापुरुष म्हणतात, 'तुम्हाला जे नकोय, त्याचा विचारही करू नका...' जेव्हा आपण त्याबद्दल विचार करतो तेव्हाच यश आणि समृद्धी मिळते...**

चांगल्या आरोग्याचे सुख मिळविण्यासाठी प्रथम स्वतःमध्ये पहा की चिंता आणि भीती तिथे लपून बसली आहे का? तुमच्या मनाच्या कोणत्या कोपऱ्यात निराशा लपून बसली आहे, जी तुम्हाला वारंवार त्रास देत आहे का? कधीकधी एक सामान्य व्यक्ती, त्याच्या शब्दांद्वारे, कृतीद्वारे आणि व्यक्तिमत्त्वाद्वारे, इतरांवर इतका प्रभाव पाडते की ते नकळतपणे प्रेरणास्थान बनतात.

व्यक्तिमत्व म्हणजे केवळ शारीरिक रचना, रंग-रुप किंवा राहणीमान नसते; बोलणे, चालणे, उठणे आणि बसणे या सोबतच ते विचार आणि मनात लपलेल्या शक्तींशी संबंधित असते. जो माणूस सतत अपयशाबद्दल विचार करतो तो कधीही यश मिळवू शकत नाही, तो कितीही सक्षम असला तरीही. केवळ सकारात्मक विचारानेच यश मिळते. नकारात्मक घटना आणि नकारात्मक विचारांनी सतत व्यस्त राहणे स्वतःसाठी हानिकारक आहे. हे विचार मनातून काढून टाकण्याचा एकमेव मार्ग म्हणजे चिंता न करता चिंतन करणे.

बंद खोलीत एकटे बसून आपल्या दुर्दैवाला शाप देऊ नका. डळमळीत पावलांनी माणूस ध्येय गाठू शकत नाही. विचार आपल्याभोवती कोळ्याच्या जाळ्यासारखे फिरतात. बाहेरून मदतीची आवश्यकता असली तरीही तुम्ही कोणत्या क्षेत्रात यशस्वी होऊ शकता ते ओळखा. मदत घेण्यास कधीही मागेपुढे पाहू नका. यशासाठी, एखाद्या ज्ञानी व्यक्तीला तुमचा गुरु बनवा आणि त्यांच्या सूचनांचे पालन न करता त्यांचे पूर्णपणे पालन करा. असे केल्याने तुम्हाला महाभारतातील अर्जुनाप्रमाणे आदर आणि यश मिळेल. ज्याप्रमाणे दुर्योधनाने भगवान श्रीकृष्णाच्या शब्दांकडे दुर्लक्ष केले, त्याचप्रमाणे ज्ञानी पुरुष किंवा शिक्षकांच्या शब्दांकडे कधीही दुर्लक्ष करू नये.

# हारे का सहारा खाटू श्याम हमारा...

## काय आहे बर्बरीकच्या शीशदानाची कहानी...

**राजस्थानमधील सीकर जिल्ह्यातील खाटू श्याम धाम हे केवळ मंदिर नाही, तर श्रद्धा, त्याग आणि भक्तीचे प्रतीक आहे. बर्बरीकच्या शीशदानाच्या कथेमुळे या मंदिराला अनन्य धार्मिक महत्त्व मिळाले आहे. दरवर्षी लाखो भक्त येथे येऊन श्याम बाबांच्या चरणी नतमस्तक होतात. खाटू श्याम बाबा यांना हारे का सहारा असेही म्हटले जाते. म्हणजे संकटात सापडलेल्या भक्ताला आधार देणारे देव. त्यामुळे भारतातील अनेक भक्तांची ही अत्यंत श्रद्धेची जागा बनली आहे.**



### खाटू श्याम मंदिराचा इतिहास

खाटू श्याम यांची कथा महाभारत या महाकाव्याशी जोडलेली आहे. खाटू श्याम यांचे मूळ नाव बर्बरीक होते. ते भीम यांचे नातू आणि घटोत्कच यांचे पूत्र होत. बर्बरीक अतिशय शक्तिशाली योद्धा होता. त्याच्याकडे तीन दिव्य बाण होते. त्याने प्रतिज्ञा केली होती की तो नेहमी युद्धातील कमकुवत बाजूला मदत करेल. हे पाहून श्रीकृष्णाने ब्राह्मणाचा वेष धारण करून त्याची परीक्षा घेतली. बर्बरीकची प्रतिज्ञा युद्धाचा समतोल बिघडवेल असे लक्षात आल्यावर कृष्णाने त्याच्याकडे शीश दान मागितले. बर्बरीकने आनंदाने आपले मस्तक अर्पण केले. त्याच्या या त्यागाने प्रसन्न होऊन कृष्णाने वर दिला की कलियुगात त्याची पूजा श्याम या नावाने होईल.

### मंदिराची स्थापना

लोककथेनुसार पुढे बर्बरीकचे मस्तक राजस्थानमधील खाटू गावात जमिनीत सापडले. एका गायीच्या थनातून त्या जागी आपोआप दूध वाहू लागले. गावकऱ्यांनी ती जागा खोदली. तेथे बर्बरीकचे मस्तक सापडले. स्थानिक राजा रूपसिंह चौहान यांना स्वप्नात आदेश मिळाल्यानंतर त्यांनी सुमारे इ.स. १०२७ मध्ये मंदिर बांधले आणि ते मस्तक तेथे प्रतिष्ठापित केले. आजचे मंदिर मकराना संगमरवराने बांधलेले असून त्याची वास्तुकला अत्यंत सुंदर आहे.

### खाटू श्याम येथे काय पाहावे?

- खाटू श्याम मंदिर : हे मुख्य मंदिर आहे. श्याम बाबांची मूर्ती आणि दर्शनासाठी सभामंडप आहे.
- श्याम कुंड : जिथे बर्बरीकचे मस्तक सापडले असे मानले जाते तो पवित्र कुंड.
- श्याम बागीचा : येथे भक्त भजन, कीर्तन आणि धार्मिक कार्यक्रम करतात.
- गौरी शंकर मंदिर : खाटू गावातील आणखी एक प्रसिद्ध मंदिर.
- निशाण यात्रा : भक्त निशाण (ध्वज) घेऊन पदयात्रा करून मंदिरात येतात.



### दर्शनासाठी योग्य काळ

- फाल्गुन मेला (फेब्रुवारी-मार्च) : सर्वात मोठा उत्सव
- एकादशी आणि रविवार : मोठी गर्दी
- हिवाळा : प्रवासासाठी उत्तम

### कसे जावे?

खाटू गाव राजस्थानातील सीकर जिल्ह्यात आहे. सर्वात जवळचे प्रमुख शहर जयपूर सुमारे ८० किमी आहे. सिकरहून ते सुमारे ४५ किमी आहे. जवळचे रेल्वे स्टेशन रिंगस असून, तिथून खाटू श्याम अंतर १७ किमी आहे.

### महाराष्ट्रातून खाटू श्याम कसे जावे?

- मुंबईहून : मुंबईहून जयपूर, थेट विमानसेवा आहे. रेल्वेने मुंबई जयपूर, सीकर, रिंगस असा मार्ग आहे. नंतर बस किंवा टॅक्सीने खाटू श्याम मंदिरात जाता येते.
- पुण्याहून : पुण्यावरून जयपूरला थेट विमान सेवा आहे. रेल्वेने आधी जयपूर, पुढे बस किंवा टॅक्सीने खाटूला जाता येते.
- कोल्हापूरहून : कोल्हापूरहून आधी मुंबई किंवा पुणे जायचे. तिथून पुढे रेल्वे किंवा विमानाने जयपूरला जाता येते. जयपूरहून खाटूला जाण्यासाठी बस, टॅक्सी भरपूर आहेत.
- छत्रपती संभाजीनगरहून : रेल्वेने आधी जयपूर किंवा दिल्ली, तिथून रिंगस रेल्वे स्टेशनला, रिंगसहून खाटूला बस किंवा शेअर जीप भरपूर आहेत.
- नांदेडहून : नांदेडहून रेल्वेने जयपूर किंवा दिल्ली, तिथून रिंगस स्टेशन. रिंगसहून खाटूला बस, टॅक्सी भरपूर आहेत.

### यात्रेकरूंसाठी उपयुक्त माहिती

मंदिराजवळ अनेक धर्मशाळा व हॉटेल्स आहेत. फाल्गुन मेळ्यात लाखो भक्त येतात. हा मेळा नुकताच होऊन गेला आहे. या मेळ्यादरम्यान जाताना आगाऊ बुकिंग करणे योग्य आहे.



# स्वप्नात पाल पाहणे शुभ की अशुभ?, स्वप्नशास्त्रात या स्वप्नांचा अर्थ काय?

**स्वप्नशास्त्रानुसार स्वप्ने भविष्याबद्दल माहिती देतात. काही स्वप्ने सकारात्मक संकेत देतात, तर काही तुम्हाला सावध करतात. तुम्ही स्वप्नात जे पाहता ते तुमच्या नियंत्रणाबाहेर आहे. पण स्वप्ने आपल्याला कोणते संकेत देतात आणि त्यांचा अर्थ काय आहे हे स्वप्नशास्त्रात सविस्तरपणे स्पष्ट केले आहे. या संदर्भात, स्वप्नात पाल पाहण्याचा अर्थ काय आहे ते पाहूया...**




- पाल पळत असणे : स्वप्नशास्त्रानुसार स्वप्नात पाल पळत असणे हे एक शुभ चिन्ह मानले जाते. असे मानले जाते की अशा स्वप्नांचा अर्थ असा आहे की जर तुम्हाला जीवनात ताण किंवा समस्या येत असतील तर तो ताण कमी होईल.
- पाल मारणे : जर एखाद्या व्यक्तीने तो पालीला मारत असल्याचे पाहिले तर ते शुभ चिन्ह आहे. या स्वप्नाचा अर्थ असा आहे की त्यांच्या अडचणी लवकरच संपतील. आतापर्यंत तुम्ही ज्या सर्व समस्यांना तोंड दिले आहे त्या आता दूर होणार आहेत.
- अनेक पाली दिसणे : स्वप्नात अनेक पाली दिसल्या तर हे चांगले स्वप्न नाही. याचा अर्थ असा की तुमच्या आयुष्यात एकाच वेळी अनेक समस्या उद्भवू शकतात. तुमच्या कारकिर्दीत तुम्हाला मानसिक दबावाचा सामना करावा लागू शकतो. मानसिक ताण वाढण्याची शक्यता देखील आहे.
- पालीचे पिल्लू दिसणे : तुम्हाला स्वप्नात पालीचे पिल्लू दिसले तर येणाऱ्या काळात तुम्हाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल. तुम्ही जे काही कराल ते पूर्ण होण्यास वेळ लागू शकतो.
- शरीरावर पाल चढणे : स्वप्नात तुमच्या शरीरावर पाल पडताना किंवा चढताना दिसली तर याचा अर्थ येणाऱ्या काळात तुमच्या शत्रूंमुळे तुम्हाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. जर तुम्हाला तुमच्या डोक्यावर पाल चढताना दिसली तर याचा अर्थ असा की तुम्हाला आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. तथापि, जर तुम्हाला डाव्या खांद्यावर पाल चढताना दिसली तर याचा अर्थ असा की तुमच्यात नवीन शत्रू निर्माण होऊ शकतात. जर पाल तुमच्या उजव्या खांद्यावर चढली तर याचा अर्थ तुम्हाला ताण येऊ शकतो.

# कपाळ, तळहातासह शरीराच्या या भागांवर तीळ असणे अत्यंत शुभ!; जीवनातील धनसंपत्ती, सुखप्राप्तीचे संकेत

**प्रत्येक व्यक्तीच्या शरीरावर तीळ असतात. काही जन्माच्या वेळी दिसतात, तर काही नंतर दिसतात. या लहान आणि मोठ्या तीळांबद्दल सामुद्रिक शास्त्रात बरेच काही सांगितले आहे. असे मानले जाते की शरीरावरील तीळ आपल्याला भविष्याबद्दल आणि नशिबाबद्दल संकेत देतात. शास्त्रांमध्ये तीळ नशिबाचे सूचक मानले जातात. शरीराच्या काही भागांवर, कपाळावर आणि तळहातावर तीळ असणे हे संपत्ती आणि आनंद दर्शवते. शरीराच्या कोणत्या भागांवर तीळ असणे शुभ मानले जाते ते पाहूया...**

- कपाळावर तीळ : सामुद्रिक शास्त्रानुसार, कपाळावर तीळ हे एक अत्यंत शुभ चिन्ह आहे. हे सूचित करते की असे लोक यशाचा मार्ग स्वतः शोधतात आणि परिश्रमपूर्वक काम करतात. ते त्यांच्या प्रयत्नांनी आणि कठोर परिश्रमाने जीवनात उच्च पदे प्राप्त करतात. परिणामी, त्यांना कधीही पैशाची कमतरता भासत नाही. कपाळावर तीळ हे संपत्तीचे लक्षण मानले जाते.
- कपाळाच्या उजव्या बाजूला तीळ : जर एखाद्या व्यक्तीच्या कपाळाच्या उजव्या बाजूला तीळ असेल तर ते देखील एक शुभ चिन्ह मानले जाते. अशा लोकांना त्यांच्या जीवनात खूप आदर आणि प्रतिष्ठा मिळते. कपाळाच्या डाव्या बाजूला तीळ हे देखील सूचित करते की असे लोक भरपूर पैसे कमवतील. शिवाय, मध्यभागी तीळ हा सौभाग्याचे लक्षण मानला जातो.
- उजव्या तळहातावर तीळ : असे मानले जाते की एखाद्या व्यक्तीच्या तळहातावर तीळ हा संपत्तीचे लक्षण आहे. अशा व्यक्ती भाग्यवान मानल्या जातात. त्यांना नशीब लाभलेले असते आणि ते खूप मेहनती असतात. त्यांच्या कठोर परिश्रमाने ते यश मिळवतात आणि मोठी उंची गाठतात.
- उजव्या गालावर तीळ : सामुद्रिक शास्त्रानुसार, उजव्या गालावर तीळ असणे शुभ मानले जाते. कारण ते संपत्ती वाढण्याचे लक्षण मानले जाते. अशा व्यक्ती श्रीमंत असतात आणि जीवनाचा आनंद घेतात. त्यांना नशीबही लाभते. तथापि, जर तीळ गालाच्या डाव्या बाजूला असेल तर ते स्वभावाने थोडेसे खर्चिक असू शकतात.
- मानेवर तीळ : व्यक्तीच्या मानेवर तीळ असणे शुभ मानले जाते. अशा व्यक्ती जीवनात आनंद आणि समृद्धी अनुभवतात आणि ते सौभाग्याचे देखील लक्षण मानले जाते. असे मानले जाते की मानेवर तीळ असणे हे सूचित करते की अशा व्यक्तींना सर्व प्रकारच्या सुखसोयी आणि विलासिता मिळतील. ते त्यांच्या कठोर परिश्रमाने त्यांच्या कारकिर्दीत प्रगती करतात.



# घरात गायीची मूर्ती कोणत्या दिशेने ठेवावी? अशा प्रकारे मूर्ती ठेवल्याने जीवनात आनंद आणि समृद्धी येईल...



**हिंदू धर्मात गाय पवित्र मानली जाते. वास्तुशास्त्रानुसार, घरात गायीची मूर्ती ठेवल्याने आजूबाजूच्या वातावरणावर सकारात्मक परिणाम होतो. असे मानले जाते की गाय शुक्र ग्रहाचे प्रतीक आहे आणि वासरू प्रेम आणि मातृत्वाचे प्रतीक मानले जाते. घरात गायीची मूर्ती ठेवल्याने आनंद, शांती आणि समृद्धी टिकून राहते. त्यामुळे कुटुंबातील सदस्यांमध्ये परस्पर प्रेम वाढते. विवाहित जोडप्यांनी घरात पितळी गायीची मूर्ती ठेवावी आणि ती मुलांसाठीही शुभ मानली जाते. तथापि, घरात गायीची मूर्ती ठेवण्यापूर्वी योग्य दिशा विचारात घेतली पाहिजे. घरात गायीची मूर्ती ठेवण्याचे वास्तू तत्व जाणून घेऊया...**

वास्तुशास्त्रानुसार, कामधेनू गायीची मूर्ती घरात योग्य दिशेने ठेवणे खूप महत्वाचे आहे. चुकीच्या ठिकाणी ठेवल्याने प्रतिकूल परिणाम होऊ शकतात. कामधेनू गाय ही देवी लक्ष्मीचे प्रतीक मानली जाते. वास्तुशास्त्रानुसार, आग्नेय दिशेने ठेवणे सर्वोत्तम मानले जाते, कारण ही दिशा शुक्र ग्रहाशी संबंधित आहे. म्हणून, या ठिकाणी पितळी गायीची मूर्ती ठेवल्याने घरात सुख, समृद्धी आणि शांती मिळते.

- घराच्या हॉलमध्ये गायीची मूर्ती ठेवा : वास्तूनुसार, तुम्ही हॉलमध्ये किंवा ड्रॉइंग रूममध्ये गायीची मूर्ती ठेवू शकता. असे केल्याने सकारात्मक वातावरण निर्माण होते आणि ते जोडप्यासाठी देखील शुभ मानले जाते. म्हणून, विवाहित जोडप्यांनी त्यांच्या घरात गायीची मूर्ती निश्चितच ठेवावी. यामुळे परस्पर प्रेम वाढते आणि त्यांच्या वैवाहिक जीवनात गोडवा टिकून राहतो.
- प्रार्थना कक्षात गायीची मूर्ती ठेवा : वास्तुशास्त्र आणि ज्योतिषशास्त्रात, पूजास्थान हे घरातील सर्वात पवित्र स्थान मानले जाते. कामधेनू गाय ही देवी लक्ष्मीचे प्रतीक आहे. म्हणून, तुम्ही प्रार्थना कक्षात गायीची मूर्ती देखील ठेवू शकता. असे केल्याने अत्यंत शुभ परिणाम मिळतात आणि ती घरात ठेवल्याने मुलांसाठी देखील शुभ मानले जाते. एकाग्रता वाढते असे मानले जाते.
- कामधेनू गाय ठेवण्यापूर्वी या गोष्टी जाणून घ्या : कामधेनू गायीची मूर्ती कधीही बेडरूम, बाथरूम किंवा इतर ठिकाणी ठेवू नये असे मानले जाते. वास्तु तज्ञ म्हणतात की असे केल्याने नकारात्मक परिणाम होऊ शकतात. ती नेहमी स्वच्छ ठिकाणी ठेवावी. जर तुम्ही तुमच्या घरात पितळेची मूर्ती ठेवत असाल तर ती आग्नेय दिशेने ठेवावी. यामुळे घरात आनंददायी वातावरण राहील.

## महाराष्ट्रात मराठी शिकवावीच लागणार

# मराठी न शिकवणाऱ्या शाळांना प्रथम समज अन् नंतर मान्यता रद्दची कारवाई, दादा भुसे यांची घोषणा



**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे बंधनकारक आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्या शाळांना प्रथम समज देण्यात येईल. त्यानंतर त्यांच्यावर थेट मान्यता रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज विधानसभेत केली.

राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार हारून खान यांनी प्रश्नोत्तराच्या तासात राज्यातील सर्वच माध्यमांच्या शाळांत मराठी भाषा शिकवणे सक्तीचे करण्यासंबंधी प्रश्न उपस्थित केला. मराठीच्या मुद्यावर गत वर्षभरात अनेक आंदोलने झाली. पण मुंबईसह महाराष्ट्रात अशा अनेक शाळा आहेत, जिथे अद्यापही मराठी भाषा सक्तीची अंमलबजावणी करण्यात येत नाही, असे ते म्हणाले. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी याची गंभीर दखल घेत या शाळांना प्रथम समज देण्यात येईल आणि त्यानंतर त्यांच्यावर थेट मान्यता रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल असे स्पष्ट केले.

दादा भुसे म्हणाले, राज्यातील प्रत्येक शाळेत मराठी भाषा शिकवणे बंधनकारक आहे. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या शाळांची कोणतीही गय केली जाणार नाही. आगामी शैक्षणिक वर्षात अशा शाळांची पुन्हा तपासणी करण्यात येईल. त्यांना पहिल्यांदा मराठी शिकवण्याची समज देण्यात येईल. पण त्यानंतरही या शाळांमध्ये मराठी शिकवण्यात आली नाही, तर त्या शाळांची किंवा संस्थांची मान्यता रद्द करण्यात येईल. यापुढे हिंदी, इंग्रजी, उर्दू, गुजराती व इतर भाषांच्या शाळांमध्ये मराठी अंमलबजावणी करण्यात येईल. यासाठी सरकार योग्य ती काळजी घेईल, असे ते म्हणाले.

तत्पूर्वी, काँग्रेस आमदार अमित देशमुख यांनीही या चर्चेत सहभाग घेतला. महाराष्ट्रात सर्व माध्यमांच्या आणि सर्व बोर्डांच्या शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीची आहे असे सांगितले जाते. पण वस्तुस्थिती मात्र वेगळी आहे. महाराष्ट्रात उड्डाण, खाउडण आणि खड बोर्डाच्या तसेच, इंग्रजी, हिंदी, उर्दू, गुजराती, कानडी व इतर प्रांतातील भाषेच्या माध्यमांच्या अशा अनेक शाळा आहेत. तिथे मराठी भाषा शिकवली जात नाही, ही वस्तुस्थिती शासनाने मान्य करावी. किमान आगामी वर्षापासून तरी महाराष्ट्रातील प्रत्येक शाळेत मराठी भाषा अनिवार्य असल्याचा जो कायदा आहे त्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे ते म्हणाले.

अमित देशमुख यांनी मागच्या आठवड्यात मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून सभागृहात सदरील मागणी केली होती. आज पुन्हा एकदा ती मागणी करत असल्याचे सांगून सरकार हा विषय गांभीर्याने घेईल अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यानंतर या प्रश्नावरील चर्चेचा समारोप करताना शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आगामी वर्षात सदरील कायदा प्रभावीपणे राबवला जाईल, असे आश्वासन दिले.

# नियम व अटींची पूर्तता केल्यासच गुंठेवारी प्रस्तावांना मंजुरी मिळणार

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील गुंठेवारी नियमितीकरणाबाबत राज्य सरकारने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. गुंठेवारी विकास नियमित करण्यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या सर्व नियम व अटींची पूर्तता करणे अनिवार्य असून, जे प्रस्ताव तांत्रिक निकष पूर्ण करतील त्यांनाच मंजुरी दिली जाईल, अशी माहिती उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांनी विधान परिषदेत दिली. विधान परिषदेत नियम ९७ अन्वये सदस्य योगेश टिळेकर यांनी गुंठेवारी प्रस्तावांबाबत अल्पकालीन चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेत प्रवीण दरेकर यांनीही सहभाग नोंदवला. या चर्चेला उत्तर देताना डॉ. सामंत बोलत होते.

मंत्री डॉ. उदय सामंत यांनी पुणे महानगरपालिकेच्या गुंठेवारी नियमितीकरणाबाबत सविस्तर माहिती दिली. राज्य शासनाने ३० एप्रिल २००१ पासून संपूर्ण महाराष्ट्रात गुंठेवारी नियमितीकरणाचा अधिनियम लागू केला आहे. याच अधिनियमाच्या आधारे पुणे महानगरपालिकेने शहर सुधारणा समितीमार्फत १२ फेब्रुवारी २०२१ रोजी विशेष ठराव मंजूर करून गुंठेवारी विकास नियमित करण्याची प्रत्यक्ष प्रक्रिया सुरू केली. या प्रक्रियेअंतर्गत आतापर्यंत एकूण १,१३३ प्रस्ताव प्रशासनाकडे प्राप्त झाले आहेत. यापैकी निकषांची पूर्तता करणाऱ्या ४० प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली असून, ३२७ प्रस्तावांवर सध्या छाननी व कार्यवाही सुरू आहे. मात्र, तब्बल ७३१ प्रस्ताव विविध कारणांमुळे नाकारण्यात आले आहेत.

प्रस्ताव नाकारण्यामागे प्रामुख्याने तांत्रिक त्रुटी आणि नियमांचे उल्लंघन ही मुख्य कारणे असल्याचे मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले. यामध्ये मोजणीचा अधिकृत नकाशा उपलब्ध नसणे, अपेक्षित मर्यादेपेक्षा जास्त अतिरिक्त बांधकाम केलेले असणे, तसेच विमानतळाच्या 'फनेल झोन'मध्ये बांधकाम झालेले असणे यांसारख्या गंभीर बाबींचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, अनेक प्रस्तावांकडे केंद्रीय संरक्षण मंत्रालयाचे ना हरकत प्रमाणपत्र (छजउ) उपलब्ध नसल्याने त्यांना मंजुरी देता आलेली नाही. फनेल झोन आणि संरक्षण विभागाच्या परवानगीशी संबंधित विषय राज्य शासनाच्या अखत्यारीत येत नसल्याने, या अटींची पूर्तता केल्याशिवाय बांधकामे नियमित करणे अशक्य असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

डॉ. सामंत यांनी स्पष्ट केले की, फनेल झोनमधील घरांना परवानगी देणे किंवा संरक्षण मंत्रालयाची एनओसी मिळवून देणे हे थेट राज्य शासनाच्या अखत्यारीत येत नाही. तसेच, गुंठेवारी नियमित करण्याबाबत शासन सकारात्मक असले तरी, कोणतेही शुल्क न घेता सर्व बांधकामे सरसकट नियमित करता येणार नाहीत. असे केल्यास महानगरपालिकेच्या महसुलावर मोठा परिणाम होईल, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

# बोर्डाचे पेपर देण्याचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांची लूट

### टेलिग्रामवर बनावट ग्रुप बनवून उकळले पैसे, शिवाजीनगर पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**पुणे (प्रतिनिधी)** – दहावी-बारावीच्या बोर्ड परीक्षेचे पेपर मिळवून देण्याचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या एका तरुणाला शिवाजीनगर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या तरुणाने टेलिग्रामवर ग्रुप तयार करून क्यूआर कोडद्वारे पैसे उकळल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला. टेलिग्राम कंपनीशी ई-मेलद्वारे पत्रव्यवहार करून संशयिताचा शोध घेण्यात आला. तपासातून आरोपीच्या बँक खात्याशी संबंधित तपशील मिळाल्यानंतर पोलिसांचे एक पथक तात्काळ चंद्रपूर येथे रवाना झाले. तपासात चैतन्य विनोद शेंडे (१८, रा. जातपुरा, चंद्रपूर) याने टेलिग्रामवर महाराष्ट्र स्टेट बोर्ड २०२६ पेपर्स नावाचा ग्रुप तयार केल्याचे उघड झाले.

या ग्रुपवर तो बोर्डाच्या पेपरची पीडीएफ फाइल अपलोड करत असल्याचा बनाव करत असे आणि तिला पासवर्ड लावून ठेवत असे. पेपर मिळवण्यासाठी इच्छुकांकडून तो प्रति पेपर ६०० रुपये मागत होता. यासाठी तो क्यूआर कोड पाठवून यूपीआयद्वारे पैसे स्वीकारत असे. लहरलीरपूर०३षरा तसेच फोनपेवरील दुसऱ्या यूपीआय आयडीद्वारे व्यवहार होत असल्याचे निष्पन्न झाले. संबंधित खाते चैतन्य शेंडे याच्याच नावावर असल्याचे स्पष्ट झाले. फसवणुकीसाठी आरोपी आधी एक पीडीएफ फाइल अपलोड करत असे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी झालेला खरा पेपर त्या फाइलमध्ये एडिट करून अपलोड करत असल्याने फाइलची वेळ पूर्वीचीच दिसत होती. यामुळे विद्यार्थ्यांना पेपर आधीच उपलब्ध असल्याचा भास निर्माण होत असे. काही जणांकडून पैसे मिळाल्यानंतर आरोपी त्यांना ब्लॉकही करत होता. या प्रकरणात आरोपीने किती विद्यार्थ्यांची फसवणूक केली आहे, याचा पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, पोलीस उपायुक्त ऋषिकेश रावले, सहायक पोलीस आयुक्त चंद्रकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीशकुमार दिघावकर व त्यांच्या पथकाने केली.

# राज्यातील अनधिकृत मोबाईल टॉवर्सचे लवकर सर्वेक्षण



**मुंबई (प्रतिनिधी)** – केंद्र शासनाचे धोरण आणि राज्याची गरज यांचा मेळ घालून भविष्यात महाराष्ट्राची स्वतंत्र 'टॉवर पॉलिसी' कशी तयार करता येईल याचा अभ्यास सुरु आहे. माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रधान सचिवांसोबत याविषयावर तातडीने बैठक आयोजित करण्यात येईल तसेच राज्यातील अनधिकृत मोबाईल टॉवर्सचे सर्वेक्षण करण्यात येईल असे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत दिली.

लक्षवेधी सूचनेद्वारे विधानसभा उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री सामंत बोलत होते. केंद्र शासनाच्या नियमावलीचा आणि राज्याच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रधान सचिवांच्या पत्राचा संदर्भ देत त्यांनी स्पष्ट केले की, मोबाईल टॉवर्सवर कोणतीही जप्ती, वीज पुरवठा खंडित करणे किंवा मालमत्ता करासंदर्भातील कठोर कारवाई करण्यापूर्वी आयटी प्रधान सचिवांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. अशा सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. ज्या ठिकाणी स्ट्रक्चरल ऑडिट पूर्ण होऊनही टॉवर्सच्या बाबतीत अडचणी येत आहेत, अशा प्रकरणांचा सविस्तर अहवाल आयटी प्रधान सचिवांना सादर करण्याचे निर्देश देण्यात येतील. जेणेकरून तांत्रिक आणि कायदेशीर बाबी तपासून त्यावर योग्य मार्ग काढता येईल.

उद्योगमंत्री सामंत म्हणाले की, या सर्व विषयांवर चर्चा करण्यासाठी आणि प्रलंबित नोटिसांच्या अंमलबजावणीबाबत स्पष्टता आणण्यासाठी माहिती तंत्रज्ञान प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागांची बैठक बोलावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. केंद्र सरकारच्या धोरणांचा अभ्यास करून आणि राज्याच्या विकासाला पूरक ठरेल अशा पद्धतीचे धोरण आखण्यासाठी शासन सकारात्मक आहे. या प्रश्नाच्या चर्चेत विधानसभा सदस्य कृष्णात खोपडे, मोहन मते यांनी सहभाग घेतला.

## शेअर मार्केट क्रॅश, गुंतवणुकदारांचे तब्बल २० कोटी बुडाले

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – भारतीय शेअर बाजारात सातत्यानं घसरण कायम आहे. अमेरिका आणि इराण युद्ध कायम राहणं, कच्चा तेल्याच्या दरात झालेली वाढ, डॉलरच्या तुलनेत रुपयात झालेली घसरण, विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून सुरु असलेली भारतीय शेअरची विक्री यासह इतर कारणांमुळं भारतीय शेअर बाजारात घसरण सुरु आहे. सलग तिसऱ्या आठवड्यात सेन्सेक्स आणि निफ्टी ५० घसरणीसह बंद झाले.

भारतीय शेअर बाजारातील प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स १३ मार्चला १४७१ अंकांनी घसरुन ७४५६३.९२ अंकांवर आला. तर निफ्टी ५० निर्देशांक ४८८ अंकांनी घसरुन २३१५१.१० अंकांवर आला. बीएसई १५० मिडकॅप निर्देशांक आणि बीएसई २५० स्मॉलकॅप निर्देशांक देखील २.६७ टक्क्यांनी घसरला.

९ ते १३ मार्च या पाच दिवसात सेन्सेक्स ४३५५ अंकांनी म्हणजेच ५.५ टक्क्यांनी घसरला. तर निफ्टी ५० निर्देशांक ५.३ टक्क्यांनी म्हणजेच १३०० अंकांनी घसरला. गुंतवणूकदारांनी या पाच दिवसांमध्ये तब्बल २० लाख कोटी रुपये गमावले आहेत.

# राज्यातील चेक पोस्ट बंद करणार, मंत्री प्रताप सरनाईकांनी दिले आश्वासन



**मुंबई (प्रतिनिधी)** – चेक पोस्ट संदर्भात लोकप्रतिनिधी तसेच विविध संस्थांकडून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर या विषयाची गंभीर दखल घेण्यात आली आहे. राज्यातील चेक पोस्ट बंद करण्याबाबत शासन सकारात्मक असून यासंदर्भात आवश्यक कार्यवाही सुरू असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली.

या संदर्भात सदस्य नाना पटोले यांनी लक्षवेधी सूचना विधानसभेत मांडली. परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, केंद्र शासनाकडूनही चेक पोस्ट रद्द करण्याबाबत सूचना करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार राज्यातील चेक पोस्ट बंद करण्याची भूमिका शासनाने निश्चित केली आहे. मात्र, चेक पोस्ट संदर्भात पूर्वी करण्यात आलेल्या कराराची मुदत अद्याप शिल्लक असल्याने त्याबाबत कायदेशीर आणि आर्थिक बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. संबंधित कंपनीशी या संदर्भात पत्रव्यवहार करण्यात आला असून करारातील अटींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.

तसेच चेक पोस्टवर अनियमितता होत असल्याच्या तक्रारीही प्राप्त झाल्या आहेत. काही ठिकाणी करारातील अटींचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्याने त्याबाबत चौकशी करण्यात येत आहे. चौकशीत ठेकेदार किंवा संबंधित अधिकारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले. याबाबत कायदे तज्ज्ञांचे अभिप्रायही घेण्यात आले असून विद्यमान करारातील तरतुदीनुसार पुढील निर्णय घेण्यात येईल. शासनामार्फत राज्यातील चेक पोस्ट बंद करण्याबाबत व त्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असेही ते म्हणाले.


## Change In Name

My Old Name is **KASHEFA BEGUM SHAIKH SHAMEEM** which now I am changing as New Name **KASHEFA BEGUM MOHAMMAD SHAIKH HUSSAIN** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address - Siddharth Nagar, Purna 431511
Dist. Parbhani, Maharashtra Mo.No. 9970977233

## Change In Name

My Old Name is **SHAIKH SK MOULA** which now I am changing as New Name **MOILANA FARIDSAB SHAIKH** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address - Kuntur Police Station, Jawal
Kuntoor - 431709
Mo.No. 9689276677


## जाहीर समन्स

**नांदेड येथील मे. न्यायाधीश, सहकार न्यायालय, नांदेड यांचे न्यायालयात.**

**वादी :-** जनकल्याण नागरी सहकारी पत संस्था मर्या. किनवट, ता. किनवट, जि. नांदेड, मार्फत अधिकृत व्यक्ती श्री. सुरेश रामदास पवार

**विरूध्द**

**प्रतिवादी :-** मिर्झा इंम्तयाज बेग मिर्झा बहादुर बेग, रा. रॉयल प्रोव्हिजन & बेकरी, सेंट्रल बसस्टँड रोड, किनवट, ता. किनवट, जि. नांदेड

| अ. क्र | सहकार केस नं. | प्रतिवादी | दावा रक्कम रूपये. | पुढील तारिख |
|---|---|---|---|---|
| १. | सी.सी.एन/१४३/२०२४ | ३.समाधान गोपीनाथ कांबळे यांचे वारसांस ३A.श्रीमती.प्रणिता समाधान कांबळे,रा.पिंपळगाव महादेव,ता.अर्धापूर,जि.नांदेड-९५६१८८६५७३. | रु.३,२४,३०३/- | दि.२७/०३/२०२६ |

ज्याअर्थी, वादी यांनी आपले विरूध्द या न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. त्याअर्थी या जाहीर समन्स / नोटीसव्दारे आपणास असे सूचित करण्यात येते की, आपण व्यक्तीश: अथवा योग्य रितीने अधिकार प्रदान करण्यात आलेला अधिकृत प्रतिनिधी, जो या दाव्याच्या संदर्भातील सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देवू शकेल अशा अधिकृत प्रतिनिधीमार्फत या न्यायालयामध्ये दि. २७/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आपल्या विरूध्द करण्यात आलेल्या दाव्याच्या संदर्भात आपले म्हणणे मांडण्यासाठी व पुरावे दाखल करण्यासाठी हजर राहावे.

उपरोक्त उल्लेखित तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास सदरील दाव्याचा निकाल आपले गैरहजेरीमध्ये करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. सदर जाहीर समन्स हे मा. न्यायाधीश यांच्या दिनांक. २५/०२/२०२६ रोजीच्या हुकुमान्वये दिले आहे.

THE CO-OPERATIVE COURT

11·3·26
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, नांदेड.

## जाहीर प्रगटन

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मुखेड यांचे न्यायालयात**

ज्याअर्थी अर्जदार लता शिवाजीराव नागमवाड रा.आंबुलगा बू ता.मुखेड त्यांचे मुलाचे कृष्णा शिवाजीराव नागमवाड रा. आंबुलगा बू यांचे जन्माची दिनांक १७/०३/२००४ मौ.आंबुलगा बू ता.मुखेड जि. नांदेड येथे जन्म झाला असून सदर जन्म नोंदणी सुधारणा कायदा २०२४ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये घेण्याकरिता निबंधक जन्म-मृत्यू निबंधक ग्रामविकास अधिकारी आंबुलगा बू यांना आदेशीत करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी, कृष्णा शिवाजीराव नागमवाड रा. आंबुलगा बू यांचे जन्माची दिनांक १७/०३/२००४ मौ. आंबुलगा बू ता.मुखेड येथे उपलब्ध नाही. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार कृष्णा शिवाजीराव नागमवाड रा.आंबुलगा बू यांचे जन्माची १७/०३/२००४ मौ. आंबुलगा बू ता. मुखेड रोजी नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसामध्ये संबधित मंडळ अधिकारी अथवा या कार्यालयात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजरी न केल्यास सदऱ्च्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

**तालुका दंडाधिकारी, मुखेड**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटन द्वारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार पवन पिता दिनकरराव बोराळकर मु. बोराळा ता. वसमत जि. हिंगोली यांनी मीरा रविकांत पंदीलवार यांच्या मालकी व ताब्यातील वार्ड क्र. ९ घर मालमत्ता क्र.१८६ क्षेत्र ४५६ चौ.फुट ज्याची चतु;र्सिमा पूर्वेस :- बेजंकीवार यांची मालमत्ता, पश्चिमेस :- नगरपालिका गल्ली, उत्तरेस:-गजानना शंकर चाडावार यांची मालमत्ता, आणि दक्षिणेस :- विजय चाडावार यांची मालमता मौजे किनवट ता. किनवट जि. नांदेड येथील मिळकत खरेदी करण्याचा सौदा केला असून काही रक्कम बयाना म्हणून दिली असून माझे पक्षकार हे लवकरच उपरोक्त मालमत्तेची रितसर खरेदी खत करून घेण्यास तयार आहे.

त्यामुळे सदर वर्णनाच्या मालमत्ते बाबत कुणाचेही काही हितसंबंध ,गहान, बोजा किंवा वारसा हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत तसे लेखी कळवावे मुदती नंतर आलेला आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व मुदतीनंतर माझे पक्षकार लवकरच खरेदी खत करून घेतील .

सबब जाहीर प्रगटन

दिनांक :- ११ /०३ /२०२६

मार्फत

अँड. डी. जि. काळे,
अँड दिलीप ग काळे
एम.ए. एल एल.एम.
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
किनवट ता.किनवट जि.नांदेड
मोबा नं-9850915392

जाहीर प्रगटन देणार

पवन पिता दिनकरराव बोराळकर
मु. बोराळा ता. वसमत जि. हिंगोली

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटन द्वारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार पवन पिता दिनकरराव बोराळकर मु. बोराळा ता. वसमत जि. हिंगोली यांनी विजय वामनराव चाडावार यांच्या मालकी व ताब्यातील वार्ड क्र. ९ घर मालमत्ता क्र.१८४ क्षेत्र ४५६ चौ.फुट ज्याची चतु;र्सिमा पूर्वेस :- बेजंकीवार यांची मालमत्ता, पश्चिमेस :- नगरपालिका गल्ली, उत्तरेस:- मीरा रविकांत पंदीलवार यांची मालमत्ता, आणि दक्षिणेस :- पवन चाडावार यांची मालमता मौजे किनवट ता. किनवट जि. नांदेड येथील मिळकत खरेदी करण्याचा सौदा केला असून काही रक्कम बयाना म्हणून दिली असून माझे पक्षकार हे लवकरच उपरोक्त मालमत्तेची रितसर खरेदी खत करून घेण्यास तयार आहे.

त्यामुळे सदर वर्णनाच्या मालमत्ते बाबत कुणाचेही काही हितसंबंध ,गहान, बोजा किंवा वारसा हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत तसे लेखी कळवावे मुदती नंतर आलेला आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व मुदतीनंतर माझे पक्षकार लवकरच खरेदी खत करून घेतील .

सबब जाहीर प्रगटन

दिनांक :- ११ /०३ /२०२६

मार्फत

अँड. डी. जि. काळे,
अँड दिलीप ग काळे
एम.ए. एल एल.एम.
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
किनवट ता.किनवट जि.नांदेड
मोबा नं-9850915392

जाहीर प्रगटन देणार

पवन पिता दिनकरराव बोराळकर
मु. बोराळा ता. वसमत जि. हिंगोली



## Change In Name

My Old Name is **ANIS FATIMA ABDUL RASHID** which now I am changing as New Name **ANIS FATIMA MOHAMMAD TAFFAZUL HUSSAIN** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address - Siddharth Nagar, Purna 431511
Dist. Parbhani, Maharashtra Mo.No. 7385335622

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेंडन, लेब्रा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# राज्यातील अनुसूचित जमातींच्या प्रलंबित प्रश्नांबाबत मंत्री, आमदारांनी घेतली राज्यपालांची भेट



**किनवट (प्रतिनिधी)** -राज्यातील अनुसूचित जमातींच्या विविध प्रलंबित प्रश्नांविषयी तसेच आदिवासी विकास विभागाशी संबंधित धोरणात्मक निर्णयाबाबत चर्चा करण्यासाठी आदिवासी विकास मंत्र्यांसह आमदारांनी शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांची भेट घेतली. यात किनवटचे आ. भीमराव केराम यांचा समावेश होता.

या संदर्भात राज्यपालांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आदिवासींच्या विकासाशी संबंधित धोरणात्मक चर्चा करण्यासाठी राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या नियम १९६० नुसार जनजाती सल्लागार परिषदेची बैठक दर सहा महिन्यांनी घेणे अनिवार्य असताना सन २०२३ नंतर बैठक घेण्यातच आली नाही. ही बैठक तत्काळ आयोजित करण्याबाबत संबंधितांना निर्देश द्यावेत, अनुसूचित जमातींची आरक्षित पदे भरताना सध्या तांत्रिक अडचणी येत आहेत. आरक्षणाचा लाभ योग्य उमेदवारांपर्यंत पोहोचण्यासाठी तसेच प्रशासकीय सुलभता येण्यासाठी आरक्षित पदे भरण्याच्या कार्यपद्धतीत सुधारणा आवश्यक आहे. सध्याच्या कामकाजात पारदर्शकता व वेग आणण्यासाठी जात पडताळणी समितीच्या कार्यपद्धतीत सुधारणा करावी, अधिसंख्य पदाच्या निर्मितीमुळे रिक्त झालेल्या १२ हजार ५०० मूळ पदांवर सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ६ जुलै २०१७ च्या निर्देशानुसार रिक्तपदांची भरती करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात यावी, बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्यासंदर्भात बंजारा समाज समावेशबाबतच्या समितीचा पुनर्विचार व्हावा, बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्याबाबत अभ्यास करण्यासाठी उच्च न्यायालयाने न्या. एम. एल. तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली २७ फेब्रुवारी २०२६ रोजी शासन निर्णयान्वये समिती स्थापन करण्यात आली आहे.

या समितीच्या स्थापनेबाबत आणि स्वरूपाबाबत फेरविचार करण्याची विनंती होत आहे. त्यादृष्टीने योग्य तो निर्णय घ्यावा, तत्कालीन राज्यपाल तथा विद्यमान उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी दि. ९ सप्टेंबर २०२४ रोजी नाशिक येथे आदिवासी विद्यापीठाच्या स्थापनेची घोषणा केली होती. आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती आणि रोजगारांच्या संधीसाठी सदर विद्यापीठ मैलाचा दगड ठरणार आहे. तेव्हा विद्यापीठ स्थापनेबाबत युद्धपातळीवर कार्यवाही करण्यात यावी. उपरोक्त मुद्दे राज्याच्या आदिवासी विकासाच्यादृष्टीने अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचे आहेत. तेव्हा संबंधित विभागांना आवश्यक ते निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. शिष्टमंडळात मंत्री डॉ. राजेंद्र गावित, नरहरी झिरवाळ यांच्यासह धर्मराव बाबा आत्राम, प्रा. अशोक उईके, डॉ. विजयकुमार गावित आदी उपस्थित होते.

# सफाई कर्मचाऱ्यांना योजनांचा लाभ वेळेत द्या -अध्यक्ष शेरसिंग डागोर

## आरोग्य, निवास, शिक्षण यांच्यासह सर्व लाभ वेळेत देण्यासाठी योजनांची अंमलबजावणी करा



**नांदेड (प्रतिनिधी)** -स्वच्छतेच्या माध्यमातून समाजात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूलभूत हक्कांसह शासनाच्या विविध योजनांचा लाभ वेळेवर मिळणे गरजेचे आहे. शासन निर्णयानुसार सफाई कर्मचाऱ्यांना तसेच त्यांच्या कुटुंबियांच्या प्रगतीसाठी विविध योजनांचे लाभ नियमानुसार व वेळेत देण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात सफाई कामगारांच्या अडचणी व प्रश्नांबाबत शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, मनपाचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, नगर पालिका प्रशासनाचे सहआयुक्त गंगाधर इरलोड, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार, सर्व नगरपालिकांचे मुख्याधिकारी, विभागप्रमुख तसेच सफाई कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत लाड-पागे समितीच्या शिफारशींनुसार सफाई कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबत चर्चा करण्यात आली. हदगाव नगर परिषदेअंतर्गत प्रलंबित प्रकरणावर येत्या आठ दिवसांत कार्यवाही करून अहवाल सादर करा. तसेच समितीनुसार असलेली सर्व प्रलंबित प्रकरणे तत्काळ निकाली काढण्याच्या सूचना अध्यक्ष डागोर यांनी दिल्या.

सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विशेष शिबिरे आयोजित करून आयुष्मान भारत कार्ड व महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजनेचा लाभ देण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच श्रमसाफल्य आवास योजनेअंतर्गत घरकुल, समाजकल्याण विभागाच्या योजनांद्वारे पाल्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती, तसेच महात्मा फुले मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळामार्फत उद्योगासाठी कर्ज वेळेत उपलब्ध करून देण्याबाबतही त्यांनी सूचना केल्या.

याशिवाय सफाई कर्मचाऱ्यांना शैक्षणिक पात्रतेनुसार पदोन्नती, साप्ताहिक सुटी, नियमित वेतन तसेच निवृत्त कर्मचाऱ्यांना प्रलंबित लाभ तातडीने देण्याची कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले. माध्यमांशी बोलताना अध्यक्ष डागोर यांनी सांगितले की, भविष्यात सफाई कर्मचारी कंत्राटी न राहता नियमित कर्मचारी करण्यावर भर देणार असल्याचे त्यानी सांगितले. निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी प्रशासन सफाई कर्मचाऱ्यांच्या हितासाठी समन्वयाने कार्य करून त्यांचे प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावेल, अशी ग्वाही दिली. प्रारंभी नगर पालिका प्रशासनाचे सहआयुक्त गंगाधर इरलोड यांनी सादरीकरणाद्वारे विविध बाबींची माहिती दिली.

# जुगार अड्ड्यावर पोलिसांची कारवाई; सहा जणांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** -बिलोली पोलिसांनी जुगार अड्ड्यावर कारवाई करून सहा जणांना अटक केली. या प्रकरणी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी जुगार अड्ड्यावरून सुमारे २ लाख २० हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई १३ मार्च रोजी सकाळी करण्यात आली.

बिलोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत सरदारनगर परिसरात काहीजण जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली. कारवाईत रोख रक्कम, मोबाईल फोन आणि इतर साहित्य असा एकूण २ लाख २० हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी योगेश नागोराव बडवे, शिवराज नागनाथ दुडले, गुंडप्पा इरप्पा चौगुले, शेख पीर अहेमद गुड्डूमिया, सुनील बाबुराव वाघमारे आणि शेख सुलेमान शेख बाबू या सहा जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार बिलोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक श्याम पानेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली बिलोलीचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले, पोलीस उपनिरीक्षक तिडके, पोलीस अंमलदार शेख, अंबुरे, धुमपतवाड यांनी केली.

# प्रा. राजाराम माने यांच्या संशोधन टीमच्या ‘विषारी वायू शोधक’ उपकरणाला केंद्र सरकारचे पेटंट

**नांदेड (प्रतिनिधी)** -स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भौतिकशास्त्र संकुलाचे संचालक आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ प्रा. डॉ. राजाराम माने व त्यांच्या संशोधन टीमने औद्योगिक क्षेत्रासाठी अत्यंत उपयुक्त असे ‘टॉक्सिक गॅस मॉनिटरिंग वेअरेबल डिव्हाइस’ विकसित केले आहे. या उपकरणाला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून अधिकृत नोंदणी प्रमाणपत्र (डिझाईन पेटंट) प्राप्त झाले आहे.

हे उपकरण औद्योगिक वसाहती, रासायनिक प्रयोगशाळा तसेच धोकादायक वातावरणात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी विकसित करण्यात आले आहे. कामाच्या ठिकाणी विषारी वायूंची पातळी वाढल्यास हे उपकरण त्वरित इशारा (अलर्ट) देऊन संभाव्य अपघात टाळण्यास मदत करणार आहे. त्यामुळे कामगारांच्या सुरक्षिततेसाठी हे उपकरण ‘स्मार्ट सुरक्षा कवच’ ठरणार असल्याचे संशोधकांनी सांगितले.



या संशोधन प्रकल्पात प्रा. डॉ. राजाराम माने यांच्या मार्गदर्शनाखाली अविनाश गायकवाड, ऋषिकेश सूर्यवंशी, विजयपाल वाधवे, प्रतीक राऊत, तेजश्री साठे यांच्यासह डॉ. रुपेश मुद्देवाड, डॉ. रवी कवळे, डॉ. संतोष जाधव आणि डॉ. श्याम गोरे यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांनी संशोधन टीमचे अभिनंदन केले. तसेच अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. पराग खडके, डॉ. हरिश्चंद्र पतंगे, डॉ. चंद्रकांत बाविस्कर यांच्यासह विद्यापीठातील विविध संकुलाचे संचालक, प्राध्यापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संशोधनाचे कौतुक करून संशोधक टीमला शुभेच्छा दिल्या.

# नांदेड येथे दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचे आयोजन

## ग्रंथदिंडी, ग्रंथप्रदर्शन व साहित्यिक मेळाव्याची मेजवानी

**नांदेड (प्रतिनिधी)** -ग्रंथसंस्कृतीचा वारसा जपणे आणि वाचन चळवळ तळागाळापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय तसेच जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्यावतीने १४ व १५ मार्च २०२६ रोजी दोन दिवसीय नांदेड ग्रंथोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

या ग्रंथोत्सवात ग्रंथदिंडी, ग्रंथप्रदर्शन, ग्रंथविक्री, साहित्यिक मेळावा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १४ मार्च रोजी सकाळी ८.३० ते १०.३० या वेळेत महात्मा जोतिराव फुले यांच्या पुतळ्यापासून ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. या वेळी उपजिल्हाधिकारी अजय शिंदे, तहसीलदार विकास बिरादार, राजकुमार माने तसेच इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यानंतर सकाळी ११ वाजता ग्रंथोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत राहणार असून, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले हे उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. या प्रसंगी ग्रंथालय संचालनालयाचे संचालक अशोक गाडेकर, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, जिल्हा ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष राजेंद्र हंबिरे तसेच इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

ग्रंथोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम व सार्वजनिक ग्रंथालयांसमोरील आव्हाने तसेच छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्वराज्य संकल्पना या विषयांवर मान्यवरांच्या उपस्थितीत परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे.

दुसऱ्या दिवशी अभिजात मराठी भाषा व साहित्य तसेच स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने या विषयांवर परिसंवाद होणार आहे. यामध्ये प्राचार्य डॉ. मा. मा. जाधव (बहिर्जी महाविद्यालय, बसमत), प्रा. संजय जगताप, डॉ. विलास वैद्य, महेश मोरे, नारायण शिंदे, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, प्रा. शामल पत्की (सचिव, नांदेड एज्युकेशन सोसायटी) तसेच विजय सुवर्णकार (राजपत्रित अधिकारी) मार्गदर्शन करणार आहेत.

ग्रंथोत्सवाचा समारोप डॉ. अच्युत बन यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून, प्रमुख अतिथी म्हणून संभाजीराव धुळगंडे, अर्जुन झाडे (जिल्हा नियोजन अधिकारी), विक्रम देशमुख (कोषागार अधिकारी), दिलीप बनसोडे (शिक्षणाधिकारी), दत्ता डांगे (इसाप प्रकाशन, नांदेड) व निर्मलकुमार सूर्यवंशी (निर्मल प्रकाशन, नांदेड) उपस्थित राहणार आहेत. गुरु गोविंदसिंग स्टेडियम परिसरातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, नांदेड येथे होणाऱ्या या दोन दिवसीय ग्रंथोत्सवाला जिल्ह्यातील सार्वजनिक वाचनालयांचे पदाधिकारी, कर्मचारी, वाचक व साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी अ. वा. सूर्यवंशी व नांदेड जिल्हा ग्रंथोत्सव आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# द्रौपदाबाई कांबळे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** -येथील



आंबेडकर नगरातील रहिवासी द्रौपदाबाई गणपतराव कांबळे यांचे शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. १४ मार्च रोजी सकाळी ९ वाजता गोवर्धनघाट स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

त्यांच्या पश्चात ३ मुली, १ मुलगा, नातू, पणतू असा परिवार आहे. त्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ नांदेड आगाराचे वाहतूक नियंत्रक राजेश गणपतराव कांबळे यांच्या आई होत.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

**नांदेड (प्रतिनिधी)** -शहरातील महात्मा गांधी मिशन (एमजीएम) अभियांत्रिकी महाविद्यालयात याच संस्थेत कार्यरत असलेल्या व नुकत्याच सेवानिवृत्त सेवकाने शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी दुपारी एकच्या सुमारास कॉलेजच्या मैदानात अंगावर पेट्रोल ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र उपस्थित कर्मचाऱ्यांनी वेळीच मध्यस्थी करून आग विझवली आणि तत्काळ त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

शहराच्या विमानतळ पोलीस ठाण्याच्या परिसरात असलेल्या एमजीएम महाविद्यालयात एक वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झालेले सुनील राधाकृष्ण कुलकर्णी (वय ५९) यांचे अर्जित रजा आणि सेवानिवृत्तीचे इतर लाभ मिळण्याच्या कारणावरून सुनील कुलकर्णी यांनी अंगावर पेट्रोल ओतून पत्नीसमोर पेटवून घेतले. उपस्थित कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी धावाधाव करत त्यांना लागलेली आग विझवली. तातडीने शहरातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे व त्यांचे सहकारी यांनीही घटनास्थळ गाठून भाजलेल्या सुनील कुलकर्णी यांचा जबाब घेतला. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** - जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था हिमायतनगर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, १६ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वा. पासून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था हिमायतनगर येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह (जागेवर निवड संधी) रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या प्लेसमेंट ड्राईव्ह /रोजगार मेळाव्यामध्ये विविध खाजगी आस्थापनामध्ये रोजगार व नोकरीच्या संधीसाठी मुलाखती घेण्यात येणार आहेत.

# पुरुषोत्तम लाटकर यांचे निधन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** -सिडको परिसरातील



ज्येष्ठ नागरिक पुरुषोत्तम शंकरराव लाटकर (जवादवार) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ७८ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, डॉ. साईनाथ, अमर, सचिन ही तीन मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे. शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी सायंकाळी सिडको येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

गेल्या अनेक वर्षांपासून आर्य वैश्य समाजासह सिडको-हडको परिसरातील विविध सामाजिक कार्यात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला होता. त्यांच्या निधनाने परिसरातील व्यापारी आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून श्रद्धांजली वाहिली.

# दाभड येथे आज छ. शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

**अर्धापूर (प्रतिनिधी)** -प्रशासनाला अधिक लोकाभिमुख करण्यासाठी आणि नागरिकांच्या महसूल संबंधित तक्रारी व कामांचा एकाच ठिकाणी निपटारा करण्यासाठी शनिवार, दि. १४ मार्च रोजी अर्धापूर तालुक्यातील दाभड येथे ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे’ आयोजन स.१० वा. दत्त मंदिर दाभड येथे करण्यात आले आहे.

या शिबिरासाठी आमदार श्रीजया चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, आणि उपजिल्हाधिकारी श्रीमती प्रियंका पवार-कर्डिले आदी उपस्थित राहणार आहेत.

एकाच छताखाली राबवल्या जाणाऱ्या मोहिमेत प्रमाणपत्रे आणि दाखले, प्रलंबित फेरफार, ७/१२ मधील त्रुटी दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ व ८-अ वाटप, उत्पन्न, रहिवासी, जात व नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्रे आणि पी. एम. किसान नोंदणी, जमीन अभिलेख अद्ययावतीकरण, अकृषिक संदर्भात काही मार्गदर्शन, ‘सनद’ प्रक्रियेची माहिती, तुकडेबंदी प्रकरणांचा निपटारा व गाव दप्तर अद्ययावत करणे, सरकारी योजनांचा लाभ, सामाजिक अर्थसहाय्य योजना, ई-मोजणी अर्ज आणि ग्रीस्टॅक नोंदणी होत असून, हे शिबीर शेतकरी, सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी आयोजित करण्यात आले आहे. दाभड मंडळातील व परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी आपल्या प्रलंबित कामांसाठी आणि सरकारी योजनांच्या लाभासाठी या शिबिरास उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार रेणुकादास देवणीकर, मंडळ अधिकारी राजू इंगळे, तलाठी उज्ज्वला वानखेडे व ग्राम महसूल अधिकारी यांनी केले आहे.

# तिरुपती यार्डमध्ये ब्रिज रूपांतरणाच्या कामामुळे काही गाड्यांच्या मार्गात बदल

**नांदेड (प्रतिनिधी)** - रेल्वे प्रशासनाकडून तिरुपती यार्ड येथे असलेल्या ब्रिजमध्ये रूपांतरण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी दि. २७ एप्रिल २०२६ ते २ मे २०२६ या कालावधीत प्रत्येकी ६ तासांचे असे एकूण ६ ब्लॉक मंजूर केले आहेत.

या कामामुळे खालील गाड्यांच्या मार्गात तात्पुरता बदल करण्यात येणार आहे. गाडी क्रमांक १६७३३ रामेश्वरम-ओखा एक्सप्रेस १ मे २०२६ बदललेला मार्ग-काटपाडी, मेलपक्कम, रेनिगुंटा. गाडी क्र. तिरुपती ०७६०५ तिरुपती-अकोला विशेष १ मे २०२६ तिरुपती, रेनिगुंटा, गूटी पाकाला, पीलेर, मदनपल्ले, मुलकलाचेरुवु, कदिरी, धर्मावरम, अनंतपूर. तेव्हा रेल्वे प्रवाशांनी प्रवासाचे नियोजन करताना या बदलांची नोंद घ्यावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# शहर वाहतूक शाखेकडून दंडात्मक कारवाई सुरूच

## वजिराबाद शाखेच्या २९२ तर इतवारा शाखेने केल्या १६५ केसेस

**नांदेड (प्रतिनिधी)** -शहरातील वाढत असलेली ट्राफिक समस्या आटोक्यात आणण्यासाठी शहरात चालणारी अवैध प्रवाशी वाहतूक तसेच विनापरवाना/परमिट चालणारी वाहने, भरधाव वेगाने चालणारी वाहने, फटाका बुलेट, रस्त्यावर लागलेले अनधिकृत फळांचे हातगाडे व वाहने यांच्यावर कारवाई करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. याच मोहिमेअंतर्गत वजिराबाद शाखेकडून जवळपास ३०० तर इतवारा शाखेकडून दीडशे कारवाई करण्यात आली आहे.

वरिष्ठांच्या आदेशावरून दि. १२ मार्च रोजी वजिराबाद शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे आणि इतवारा शाखेचे पोलीस निरीक्षक जगन पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी रेल्वे स्टेशन रोड, महावीर चौक, कलामंदिर, वर्कशॉप, राजकॉर्नर व छत्रपती चौक, बर्की चौक, जुना मोंढा, भगतसिंग चौक, देगलूर नाका, मनियार गल्ली, कापड मार्केट या ठिकाणी वाहनांची कागदपत्रे तपासणी



केली. सोबतच ऑटो चालकांना गणवेश परिधान करणेबाबत सुचना दिल्या. वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर, ट्रिपल सिट वाहने, परवाना नसलेली वाहने, रस्त्यावर लागलेले अनधिकृत फळांचे हातगाडे, वाहने व इतर यांचेवर कारवाई केली. तसेच २९२ केसेस करून ३ लाख ४१ हजार ३०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. तर तिकडे इतवारा शाखेने १५० हून अधिक कारवाया करून एक लाखाहून अधिक दंड वसूल केला.

वाढत असलेल्या ट्राफीकमुळे लोकांनी त्यांची चार चाकी/दोन चाकी वाहने कुठेही पार्क न करता पार्कीगचे ठिकाणी पार्क करावे, वाहतुकीस अडथळा निर्माण होईल या प्रकारे कोणतेही फळगाडे व इतर असे रस्त्यामध्ये लावून अतिक्रमण करू नये, सिग्नलचे पालन करावे व वाहतुकीस अडथळा होईल अशी कोणतीही कृती करू नये. तसेच पोलीस प्रशासनास सहकार्य करावे अन्यथा मोटार वाहन कायदा व इतर कायद्यान्वये कडक कारवाई करण्यात येईल. बाबत पोलीस प्रशासनाचे वतीने आवाहन करण्यात येत आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली वजिराबाद आणि इतवारा शहर वाहतूक शाखेने केली आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com